परस्परं भावयन्तः
म प्र
मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ८४ ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ डिसेंबर, २०१०

वेबसाईट : www.marathepratishthan.org ✦ ई मेल : maratheparivar@yahoo.co.in

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय



प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा सप्रेम नमस्कार. आपला 'हितगुज'चा अंक म्हणजे कपी गोत्री मराठे, विद्वांस, खांबेटे, चक्रदेव, जोशी, जाईल, रटाटे व फडणीस ही आडनावे असलेल्या परिवाराच्या संघटनवाढीसाठी आणि परिचय होण्यासाठी नक्कीच उपयोगी आहे.

या अंकात सौ. श्यामला पुरंदरे (जाईल) यांचा 'माझ्या सुखाच्या कल्पना' हा ललित आकृतीबंध, 'श्रद्धा' ही सत्यकथा, 'आमचे दादा' हे व्यक्तीचित्र त्यांचे चिरंजीव डॉ. चंद्रशेखर चिं. मराठे यांच्या लेखणीतून साकार झाले आहे. त्यांच्या तीर्थरूपांचा जीवनपट म्हणजे मोठ्या चढउतारांचा एक यशस्वी प्रवास आहे.

चित्रकार कुमुद डोके (मराठे) यांना मिळालेले मानपत्र आणि अभियंता श्री.वि.म. मराठे यांना मिळालेला 'जीवनगौरव' पुरस्कार यामुळे मराठे परिवाराची मान ताठ झाली आहे. विश्वाच्या विविधतेने नटलेल्या अफाट अशा क्षितिजाला स्पर्श करण्याची किमया चित्रकाराच्या कुंचल्यातून साधली जाते. तर अभियंता हा आधुनिक विश्वाचा निर्माता मानला जाते. दोन्ही सत्कारमूर्तींचे सर्व मराठे परिवाराद्वारा हार्दिक अभिनंदन!

तसेच, बुद्धीबळपटू सोहनचा अल्प-परिचय, 'अतिथी देवो भव' हा सौ. मीना सदानंद मराठे यांचा अविस्मरणीय अनुभव सांगणारा लेख, 'आढे सांभाळणारी तपस्विनी' मनाला चटका लावून जाते. सासूबाईंनी सुनेस लिहिलेल्या पत्रावरून त्या किती प्रेमळ, समजूतदार आहेत. अशाच सासवा सगळ्या सूनांना लाभल्या तर त्या किती भाग्यवान ठरतील नाही?

'हितगुज' अंकाविषयीच्या प्रतिक्रिया 'वाचकांच्या पत्रव्यवहारातून वाचायला मिळतील, चित्रकार कुमद डोके यांनी हितगुजची पत्रातून केलेली रसपूर्ण, आस्वादक समीक्षा चिंतनीय.

श्रीव्याडेश्वराची आरती, विद्या वैशंपायन यांची कविता - जे चार-सहा पाने किंवा त्याहून मोठा लेख लिहून लिहिता येणार नाही ते विद्याताईंनी एका कवितेतून गौरवगाथा व्यक्त केली आहे.

श्री. अभय मराठे यांनी आंध्रमध्ये केलेले सीमोल्लंघन, 'स्तोत्र मंत्रपठण' या श्री. अ. द. मराठे यांच्या लेखातून भिक्षुकी करणाऱ्या किंवा करू इच्छिणाऱ्या कुलबंधूंना वेगला विचार वेळीच मिळेल. प.पू.गजानन महाराजांचा निर्वाणदिन त्या अनुषंगाने त्यांचे स्मरणार्थ वाचकांना अनुभव जाणावयास मिळावा व महाराजांच्याचरणी श्रद्धा राहावी या हेतूने श्री सदाशिव बळवंत मराठे यांनी लिहिलेला लेख हे सर्वच साहित्य वाचनीय आहे. नवीन वर्ष मराठे परिवाराला सुख-समृद्धीचे, भरभराटीचे, आरोग्यसंपन्न जावो ही शुभेच्छा,

- आपली शुभचिंतक

**डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे, (पृ.१२०)**

८/१३, सहकार नगर, वडाळा,

मुंबई ४०० ०३१

दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९


२३ नोव्हेंबर, २०१०

◉ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे : ८/१३, सहकारनगर, वडाळा (पू.), मुंबई-४०००३१ ◉

दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com

◆ अक्षरजुळणी : सौ. अनघा विवेक मराठे, ठाणे. फोन : ९८३३१११९०२ ◆

## जाखोटिया दाम्पत्याचे 'फायनान्स' या विषयावरील सुंदर, सोपे पुस्तक प्रकाशित




'फायनाशिअल मॅनेजमेंट' किंवा 'अर्थव्यवस्थापन' हा विषय क्लिष्ट आणि कंटाळवाणा. बरेचजण या विषयाच्या वाटेला जात नाहीत. पण हल्लीच्या स्पर्धात्मक व अनिश्चित वातावरणात हा विषय प्रत्येकालाच कळला पाहिजे. अशा सामाजिक जाणिवेने डॉ. गिरीश व सौ. मंजिरी जाखोटिया (मराठे पृ.१२८) या दाम्पत्याने 'फायनान्स मेड सिंपल' असे शीर्षक असलेले पुस्तक लिहिले आहे व स्वत:च्या 'जाखोटिया ॲण्ड असोसिएटस' या सल्लागार संस्थेतर्फे प्रकाशित केले. नुकतेच श्री. कुमार केतकर, संपादक लोकसत्ता यांच्या हस्ते हे प्रकाशन झाले. अत्यंत सोपी भाषा, भरपूर उदाहरणे, उत्तम छपाई व खूप वाजवी किंमत असलेले हे पुस्तक अल्पावधीतच चर्चेचा विषय ठरला आहे. नोकरदार, उद्योजक, सामान्य गुंतवणूकदार, विद्यार्थी, विश्लेषक, निवृत्त वरिष्ठ नागरिक, दुकानदार इत्यादि सर्वांसाठी हे पुस्तक खूप उपयुक्त आहे. बॅलन्सशीट व नफा-तोटा पत्रक बनविणे, उद्योगाच्या वित्तीय तब्येतीचे विश्लेषण करणे, खेळत्या भांडवलाचे नियोजन, अर्थसंकल्प (बजेट) बनवणे, गुंतवणुकीचे निर्णय घेणे व विश्लेषण करणे इ. अनेक बाबी अत्यंत सोप्या पद्धतीने या पुस्तकात मांडल्या आहेत.

गेल्या २७ वर्षात तब्बल १५,०० कार्यशाळांमधून ३०,००० सहभागींना 'फायनान्स' हा विषय जाखोटियांनी शिकवला आहे. हा सारा अनुभव या पुस्तकातून आपणास दिसतो. २०० पानांचे हे पुस्तक रु.१९०ला उपलब्ध आहे. प्रत्येकाला हे पुस्तक घेता यावे म्हणून जाखोटियांनी हे पुस्तक आता रू. १५० या किमतीत देऊ केले आहे. प्रत्येकाच्या घरी वा कार्यालयात हे पुस्तक असायलाच हवे. पुस्तकासाठी संपर्क येथे करता येईल :

**जाखोटिया ॲण्ड असोसिएटस,** ७०२ यशवंत अपार्टमेंट, चित्तरंजन रोड, विलेपार्ले (पू.), मुंबई-४०० ०५७
दूरध्वनी :०२२- २६१२३०५९/२६१८५९५९ मोबाईल :०९८६७९७२६१
ई-मेल : jakhotiya_girish@yahoo.co.in

## राजापूरच्या नगराध्यक्षपदी युतीच्या अपूर्वा मराठे (पृ.१५६)



राजापूरच्या नगराध्यपक्षपदीच्या निवडणुकीत पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा फडकला आहे. कॉंग्रेसपुरस्कृत अपक्ष उमेदवाराचा पराभव करत शिवसेना-भाजप युतीच्या अपूर्वा मराठे या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजयी झाल्या आहेत. विजयानंतर मित्रपक्षाला एकत्र घेऊन राजापूर शहराचा विकास साधणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

राजापूर नगर परिषद नगराध्यक्षपदाची निवडणूक आज पार पडली. या निवडणुकीत शिवसेना-भाजप युतीच्या उमेदवार अपूर्वा मराठे यांची लढत कॉंग्रेसपुरस्कृत अपक्ष उमेदवार दीपा बोळे यांच्याशी होती. अपक्ष उमेदवाराला पाठिंबा देऊन निवडणूक जिंकण्याची स्वप्ने पाहणाऱ्या कॉंग्रेसला शिवसेना-भाजप युतीने पुन्हा एकदा जागा दाखवली. शिवसेना-भाजप युतीच्या उमेदवार अपूर्वा मराठे यांनी ९ मते घेत विजयावर शिक्कामोर्तब केले. कॉंग्रेसपुरस्कृत अपक्ष उमेदवार दीपा बोळे यांना ८ मते मिळाली. या वेळी जिल्हाप्रमुख राजेंद्र महाडिक, आमदार राजन साळवी, तालुकाप्रमुख प्रकाश कुवळेकर, शहरप्रमुख अनिल कुडाळी, भाजप जिल्हाध्यक्ष दत्ता देसाई, उपजिल्हाप्रमुख दत्ता कदम आणि मान्यवर उपस्थित होते. मराठे प्रतिष्ठानद्वारा सौ. अपूर्वा मराठे यांचे हार्दिक अभिनंदन! मोबाईल : ९०९६७५७१६१ दूरध्वनी :०२३५३-२३२०९४

**साभार - दै. सामना दि.२५ नोव्हेंबर २०१० वरुन**

# स्तोत्र मंत्र पठण

**श्री. अ. द. मराठे**

डोंबिवलीच्या गणेश मंदिर संस्थानकडून गणपती अथर्वशीर्ष पठणाची स्पर्धा घेतली जात असे. त्या स्पर्धेच्यावेळी नेमलेल्या परीक्षक गटात काम करण्याची संधी मला दोन-तीन वेळा मिळाली. त्या वेळी आलेले अनुभव आणि पाठांतर करण्याचे शास्त्र या विषयाची मला असलेली माहिती मराठे बंधूभगिनींना देण्यासाठी हाती पेन घेतले आहे.

प्रथम स्तोत्र आणि मंत्र यांच्यातील भेद जाणून घेऊ या. स्तोत्र म्हणजे एखाद्या देवतेची स्तुती करण्यासाठी केलेली पद्यरचना. त्यामध्ये देवतेचे गुण, पराक्रम यांचे वर्णन असते. त्या स्तोत्राचे पठण केल्याने कोणते लाभ होतात ते सांगितलेले असते. स्तोत्राचे दिवसातून कधी व किती वेळा पठण करावे हेही सांगितले असते. त्याला फलश्रुती असे म्हणतात. स्तोत्रांचे पठण सामान्यत: सायंकाळी केले जाते. काहीजण अंघोळ करतानासुद्धा स्तोत्रपठण करतात. ज्या काळात विजेचे दिवे नव्हते; त्या काळात सूर्यास्तानंतर काळोख होण्याच्या आत दिवसातील कामे संपवून घर गाठायचे. घरात मिणमिणते दिवे असत. या वेळेचे वर्णन कातर वेळ, करकरीत तिनसन्या, तिन्हीसांजा, भुताची वेळ असे करीत. ज्या घरात या वेळी भांडणे, शिवीगाळ, अभद्र गप्पा, आळसाने झोपणे असे होत असते तिथे लक्ष्मी प्रवेश करीत नसते. उलट जिथे प्रसन्न, आनंदी वातावरण असेल तिथे लक्ष्मी प्रवेशायची. म्हणून स्तोत्रपठणासाठी ही वेळ योग्य मानली जाते. इथेच एक श्रद्धा नमूद करतो, सायंकाळी घरात एखादी बेडकी येत असे. तिच्या रूपाने लक्ष्मी घरात येते असे मानून तिला घरात आश्रय मिळे.

मंत्र हे एखाद्या विधीचे, अनुष्ठानाचे अत्यावश्यक अंग असतात आणि त्यामुळे ते विधीप्रसंगीच उच्चारले जातात. हे मंत्र विशेषत: ऋग्वेद, यजुर्वेद यातून घेतलेले असतात. मंत्रांच्या सामर्थ्याने शत्रूचा नाश, अनिष्ट, आपत्ती, पाप यांचे निर्मूलन, अशौचाचें शुद्धीकरण अशी कार्ये घडतात. त्यामुळे मंत्रपठण हे काही प्रयोजन (उपयोग) पुढे ठेवून विशिष्ट ब्राह्मणांकडूनच म्हणवून घेतले जाते. म्हणजेच मंत्रपठणाचा अधिकार काही विशिष्ट व्यक्तींनाच असतो. त्या व्यक्तींवर खाण्यापिण्याचीच नव्हे तर आचरणाची कडक बंधने पूर्वी होती. त्यांची उपजीविका भिक्षेवर चालयची म्हणून त्यांना भिक्षुक हे नाव पडले.

काही मंत्रांना फलश्रुती जोडलेली असते. ही फलश्रुती पुरोहिताने यजमानाला समजावून सांगायची असते. आज मात्र ती मंत्राबरोबरच धडाधड म्हणून टाकली जाते! मंत्रयुक्त अनुष्ठानात यजमानाने काय काय क्रिया कराव्यात याच्या सूचना असतात. उदा. त्रि: अचम्य म्हणजे तीनदा आचमन करून. त्या पुरोहिताने मराठीत सांगायच्या असतात. मात्र नाटकात कंसात ‘शिवाजी तलवार उपसून’ असे नटाने म्हणून तलवार उपसण्याचा विनोद पूर्वी घडल्याचे सांगतात आणि आताचे पुरोहित तो करतात.

मंत्रपठणात तीन गोष्टी महत्त्वाच्या : १. उच्चारण २. आवृत्ती ३. अनुष्ठान

१. उच्चारण हे योग्य गुरूकडून शिकून घ्यायचे असते. याला संथा घेणे अशी संज्ञा आहे. संस्कृतमध्ये श ष आणि स यांचे पूर्णपणे स्वतंत्र उच्चार आहेत. श चा उच्चार तालु म्हणजे दातांच्या मागच्या भागाला जिभेचे टोक लागते ती जागा. ष चा उच्चार करताना जिभेचे टोक दुमडल्यासारखे होऊन ताळूला लागते. स चा उच्चार करताना जिभेचे टोक दाताला लागते. हे उच्चार गुरूकडूनच शिकावे लागतात. विसर्गानंतर येणाऱ्या प फ चे उच्चार उपध्मानीय या नावाने ओळखले जातात. तर विसर्गानंतर येणाऱ्या क ख च्या उच्चारांना जिव्हामूलीय उच्चार म्हणतात. हे उच्चार तर केवळ गुरू-मुखातूनच शिकता येतात. (दुर्दैवाने आज अनेक गुरूंना याची माहितीच नसते.) विसर्गाचा उच्चार हा भारताच्या वायव्येकडील विशेषत: पठाणांच्या भाषेतून आलेला उच्चार आहे. एखादा पठाण ‘या अल्लाह’ म्हणतो तेव्हा त्याच्या ह च्या उच्चार हा खराखुरा विसर्गाचा उच्चार आहे. तो उच्चार आपणाला तितका परिपूर्ण जमत नाही. मात्र चांगल्या जाणकार गुरुकडून त्याचा ‘गणेशहा’ असा उच्चार होण्यापासून आपण बचावतो. वैदिक मंत्रात उदात्त, अनुदात्त आणि स्वरित असे तीन वेगवेगळे उच्चार असतात. ते तर जाणकार गुरूकडूनच शिकावे लागतात. या वैदिक उच्चारांचे महत्त्व किती हे सांगणारी एक कथा आहे. इंद्राचा शत्रु वृत्र याने इंद्राचा नाश व्हावा म्हणून यज्ञ केला. त्यात इंद्र शत्रूचा नाश होवो या अर्थाचा एक चरण होता. मात्र इंद्रशत्रु: याचा उच्चार पुरोहिताकडून चुकला आणि इंद्र आहे शत्रू ज्याचा या ऐवजी इंद्राचा शत्रू मरो असा अर्थ (की अनर्थ?) झाला आणि वृत्राचा नाश झाला.

२. गुरूकडून संथा मिळते. मात्र गुरू सगळा मंत्र एकाच बैठकीत शिकवून शकत नाही. मंत्राचा काही भाग वारंवार घोकून, घटवून पाठ करणे आवश्यक असते. त्यासाठी गुरूकडील पठण संपल्यावर घरी जाऊन त्याची आवृत्ती करावी लागते. आवृत्ती म्हणजे वारंवार उच्चार करून संपूर्ण मंत्र घटविणे आणि तो कायमचा स्मरणांत ठेवणे. मंत्र घोकण्याची साधारण पद्धत अशी गुरू १,२,३,४ या प्रमाणे मंत्राचे चरण किंवा कडवे याप्रमाणे मंत्राचा जो भाग असेल त्याची संथा देतो. ते घटवून झाले की ५,६,७,८ यांची संथा देतो. शिष्याने घरी जाऊन १ ते ८ व पुढे वाढत जाईल त्या क्रमाने पुढचा भाग त्यात मिळवत आवृत्ती करायची. आवृत्तीमुळे मंत्र स्मरणात पक्के बिंबून राहतात.

३. अनुष्ठान म्हणजे प्रत्यक्ष उपयोग. कोणत्या मंत्राचा कोणत्या पूजेच्या किंवा विधीच्यावेळी उपयोग करायचा हे ठरलेले आहे. त्याप्रमाणे उपयोग करणे म्हणजे अनुष्ठान. काही मंत्रांच्या ठरावीक वेळी आणि ठरावीक पद्धतीने केलेल्या

अनुष्ठानामुळे मंत्रपाठकाला काही एक फळ मिळते. त्याला सिद्धी असेही म्हणतात. गणपती अथर्वशीर्षाच्या फलश्रुतीत अशा अनेक अनुष्ठानांचा व त्यांच्या फळांचा उल्लेख आहे. उदा. सायमंधीयानो दिवसकृतं पापं नाशयति: म्हणजे सायंकाळी जो मंत्राचे पठण करतो तो त्याचे दिवसभरातील पाप नष्ट करून टाकतो. इत्यादी.

पाणिनीय शिक्षेतील एक श्लोक असा आहे-

गीती शीघ्री शिर:कंपी तथा लिखितपाठक:


अनर्थज्ञोऽल्पकंठश्च षडेते पाठकाधमा:

अनावश्यक गायन करणारा, भराभर उच्चारण करणारा, डोके हलवत म्हणणारा, लिहिलेल्याचे निर्जीव वाचन करणारा, आपण जे वाचतो आहोत त्याचा अर्थ न जाणणारा आणि कोता आवाज असलेला हे सहा अधम श्रेणीचे पाठक आहेत.

स्तोत्राचे पठण आणि मंत्राचे पठण यातील भेद असा आहे. या दोहोंचीही गुरूमुखातून संथा घेणे योग्य अशी संथा हे एक तपच आहे. तपाशिवाय सिद्धी नाही. तेव्हा हौस म्हणून किंवा फावल्या वेळात कमाईचे साधन म्हणून जरी पौरोहित्य करायचे असले तरी किमान तप आवश्यक आहे हे विसरू नये.

**- अ. द. मराठे**
१० शांतिनाथ अपार्टमेंट,
१६८ यशवंत नगर, तळेगाव दाभाडे
जिल्हा पुणे - ४१० ५०७

## पुस्तक परिचय




# "ओळख अमृतानुभव ग्रंथा"ची

**लेखक : डॉ. चिंतामणी मराठे**

संत ज्ञानेश्वर महाराज यांनी लिहिलेल्या ''अमृतानुभव'' या ग्रंथाची वाचकास व साधकास थोडक्यात तोंडओळख व्हावी म्हणून वरील पुस्तिका (२४ पाने) लिहिली. त्यात मूळ उद्देश वरील ग्रंथ आपले गुरू निवृत्तीनाथ महाराज यांच्या आज्ञेवरून ज्ञानेश्वरी (भ.गीतेवरील टीका) लिहिल्यावर लिहिला. गुरु आज्ञेनुसार आपल्या स्वानुभवावर आधारित अंतिम तत्त्व व त्याचे ज्ञान व आत्मवस्तू प्रत्येकाने जाणून घेणे महत्त्वाचे आहे हे दाखवून दिले. हा दशप्रकरणात्मक (८३० ओव्या) अवघड तत्त्वज्ञान आहे, त्याच्याकडे वाचकांचा व साधकांचा ओढा कमी असतो. त्यानिमित्त लेखकाने फक्त त्यांची ओळखरूपात मांडली आहे, तद्नंतर मूळ ग्रंथ वाचण्याची ओढ लागेल.

ह्या पुस्तिकेचे प्रकाशन गीताधर्ममंडळ, कोथरूड यांच्यातर्फे गीताजयंती २००९ उत्सवात ''श्री योगीराज महाराज गोसावी पैठणकर' (विश्वसंत एकनाथ महाराज यांचे १४ वे वंशज) यांच्या शुभहस्ते त्रिदल सभागृह, झाला सोसायटी, रविवार दिनांक २९ नोव्हेंबर, २००९ रोजी झाले. पुस्तिकाप्रकाशनानंतर योगीराज महाराज यांचे अमृतानुभव व संत साहित्य व त्याचे कार्य यावर श्रोत्यांसाठी विचार प्रबोधन झाले. पुस्तिकेच्या शीर्षकावर व उद्देशाबद्दल विशेषकरून त्यांनी समाधान व्यक्त केले. तद्नंतर संत एकनाथ महाराज यांच्या कार्यावर महाराजांनी प्रकाश टाकला. व ते कसे विचारप्रवर्तक होते हे दाखवून दिले. ब्रह्मानंद म्हणजे काय, आत्मा व परमात्मा यांची उकल सर्वांस विदीत केली. सर्व श्रोतृगण त्या विचारांनी भारावून गेले. व त्यांना हा एकनाथ महाराजांचा एकविसाव्या शतकातील अवतारच आहे असे वाटले. ह्या कार्यात तरुण वर्गाने जास्तीत जास्त सहभाग घ्यावा असे त्यांनी ठासून सांगितले, व त्याची जबाबदारी ज्येष्ठ नागरिकांवरच आहे व त्यांनी लहानपणापासून संस्कार करणे महत्त्वाचे आहे. ज्या कारणे साप्रंतच्या सामाजिक व कौटुंबिक समस्या यशस्वीपणे दूर होतील असा मार्ग दाखवला. सर्व श्रोतृगण पाहुण्याच्या (वय अवघे २६ वर्षे महाराजांचे) विचार व व्यक्तिमत्त्वामुळे भारावून गेले.

वरील उपरनिर्दिष्ट पुस्तिकेस श्रोतृवर्ग व इतरांकडून चांगला प्रतिसाद मिळालेला आहे. विषय अवघड आहे, एक-दोन वेळा वाचल्यावर मूळ ग्रंथ वाचण्याची ओढ निर्माण होते हीच खरी फलश्रुती म्हणता येईल

डॉ. चिंतामणी मराठे
फ्लॅट नं.१५, अमोली अपार्टमेंटस, संगमप्रेस रोड, कोथरूड,
पुणे ४११०३८ दूरध्वनी : ०२०-२५४४९२८७

**वैकुंठवासी ती. पिताश्री दामोदर हरि मराठे यांच्या पवित्र, प्रेमळ स्मृतीस अभिवादन**

श्री. प्रभाकर मराठे (पृ.१२०) ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई ४०० ०३१

सेल : ९८२०२३२०८२ दूरध्वनी : २४१५०८८९ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com

# ‘आमचे दादा’

**डॉ. चंद्रशेखर चिं. मराठे (पृ. २४८)**

माझे वडील म्हणजेच चिंतामण त्र्यंबक मराठे यांना आमच्या परिवारातले सर्वजण ‘दादा’ म्हणून ओळखतात. त्यांना हे नाव घरातील सर्वांत मोठा मुलगा म्हणून लहानपणीच जडले होते. त्यांचा जीवनपट म्हणजे मोठ्या चढउतारांचा एक प्रवास आहे.

त्यांचा जन्म ८-१२-१९३४ रोजी माणगाव (जि. रायगड) जवळील बोरवाडी ह्या लहानश्या खेडेगावात झाला. त्या वेळी गावात फक्त चौथीपर्यंत शाळा होती. त्यांना ५ बहिणी व ६ भाऊ असल्याने घरची परिस्थिती बेताचीच होती. माझी पणजी नेहमी आजीला उद्देशून म्हणायची, ‘‘तिने १०० तोळे सोन्याचे वाटोळे केले.’’ आम्हाला त्याचा अर्थ कधीच कळला नाही. दादांनी ५वी ते ७ वी पर्यंतचे शिक्षण रोह्यातील ओक वकिलांकडे राहून केले. पुढे शिक्षणाची काहीच सोय नसल्याने परत बोरवाडीला येऊन शेती आणि भिक्षुकी शिकण्यात वेळ घालवू लागले. त्यातच महाडला गाडगीळांकडे राहून एक वर्ष स्पेशल इंग्रजीचा कोर्स पूर्ण केला. बोरवाडीला त्यांचे मन काही केल्या शेतीत लागत नव्हते आणि घरची आर्थिक स्थिती त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. एकदा तर पाठचे भावाबरोबर दिवसभर १५ कि.मी.ची पायपीट करून शेंगटाच्या शेंगा विकून पाटीच्या पेन्सिली आणल्या. तशातच १९४९ साली पुण्याहून गावी आलेल्या जोगळेकर बाईंनी त्यांची पुण्यात एक वर्ष राहण्याची सोय केल्याने ते पुण्याला वारावर राहून आठवी इयत्ता पूर्ण केली. तिथे त्यांना पुणे विद्यार्थी गृहाची माहिती मिळाली. तिथे शिक्षणाबरोबर खाणे व राहणेसाठी खर्च लागत नसल्याने ते तडक अविगृहात हजर झाले. तिथे त्यांनी ९वी ते ११वीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. तिथेच त्यांनी तीन वर्षांचा प्रिंटिंग टेक्नॉलॉजीचा कोर्स पूर्ण केला. ते दिवस त्यांचे कष्टाचे होते, पण त्याला दुसरा पर्याय नव्हता. ते आजही म्हणतात की, ‘‘मी जर हे कष्ट केले नसते तर आज कदाचित तुम्हाला हे करावे लागले असते.’’ ते सुट्टीत गावी येत व भावंडांान पुण्याच्या गमती सांगत. पुण्यात असताना अनेक थोरामोठ्यांना पाहण्याचा व ऐकण्याचा त्यांना योग आला. एकदा गावाहून आजीनी दिलेली चिवड्यचाी पुडी त्यांनी रात्री २ वाजता रेल्वे स्टेशनवर खाल्ली कारण एक उंदीर काही केल्या त्यांना स्वस्थ झोपू देईना.

स्वत:च्या कुशाग्र बुद्धी व तब्येतीच्या जोरावर त्यांनी १९५४ साली नौसेनेत प्रवेश केला. त्यांची पहिली बदली कोचीनला झाली. पुढे २५वर्षे सततच्या बदलीमुळे पूर्ण भारत त्यांनी पालथा घातला. १९६० साली दिल्लीला असताना त्यांचे लग्न झाले. लग्नानंतर मुंबई पण न पाहिलेली माझी आई दिल्लीला गेली. त्या वेळी इडली हा पदार्थ अंड्यापासून बनवला जात असल्याची समज असल्याने आई तो टाळत असे. एकदा हरियाणामधील त्यांच्या मित्राच्या गावी आई-दादा गेले असता तिथे त्यांना ‘मुंबईचे पाहुणे’ म्हणून पाहायला अलोट गर्दी उसळली होती. कधी जहाजावर तर कधी जमिनीवर त्यांची पोस्टींग असे. नेव्हीतल्या नोकरीमुळे त्यांनी सिलोन (दहा वेळा), अंदमान-निकोबार, लक्षद्वीप, मलेशिया, ऑस्ट्रेलिया, फिजी, सिंगापूर, मॉरिशस ही ठिकाणे पाहिली. १९६७ साली मॉरिशसच्या स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात त्यांना हजर राहण्याचा योग आला. फिजीतील भारतीयांसमोर केलेल्या स्वातंत्र्यपर भाषणामुळे त्यांचेवर तेथील ब्रिटीश सरकारकडून कठीण प्रसंग ओढवला होता. अविगृहातील स्वावलंबी जीवन व लष्करातील शिस्तीमुळे त्यांच्यात एक प्रकारचा हिशेबीपणा आणि कडकपणा आल आहे. शिस्तीमुळे आमचे बरेचसे नातेवाईक त्यांच्या जवळ अदबीने वागत. आम्हीपण ते घरात असले की चूप असायचो. रात्री ब्लॅक आऊटचे भोंगे वाजू लागले की घरातले सगळे दिवे मालवून आम्ही आईजवळ बसायचो. दादा मात्र रामरक्षा म्हणू लागले की शत्रूची विमाने आल्याचा आम्हाला सारखा भास होई. लोणावळ्याजवळचा शिवाजी नावाचा बेस आम्हा मुलांसाठी स्वच्छंदपणे जगण्यासाठी स्वर्ग होता. तिथे अनेक देशविदेशचे नौसेनेतील विद्यार्थी शिकण्यासाठी येत. आम्हा मुलांचे शाळेच्या मागच्या जंगलात आंबे, जांभूळ, अळू खात फिरणं, स्विमिंग पूल मध्ये पोहणं, मध्ये क्लबहाऊसमध्ये बॅडमिंटन किंवा टेबल-टेनिसचा डाव टाकणे, किंवा जिममध्ये बॉक्सिंगचे ग्लोव्ह घालून गुद्दागुद्दी करणे, थिएटरमध्ये जाऊन हळूच पडद्याआडून सिनेमा पाहणे किंवा बंद पडलेल्या अवजड ट्रक्स किंवा विमानात बसून ड्रायव्हिंगची हौस भागवणे. किंवा तिथे शिकायला आलेल्या परदेशी सैनिकांकडून नाणी आणि स्टॅम्प गोळा करीत फिरत असू. हे सगळे करताना दादांचे ऑफिसचे ठिकाण आम्ही जाणिवपूर्वक टाळत असू. आम्हाला शोधून काढणे हा आईच्या डोक्याला मोठा ताप होता. पण तिने क्वचितच दादांकडे आमची तक्रार केली. दादांची बदली कोचिन, विशाखा-पट्टणम, कलकत्ता, मद्रास, लोणावळा करीत मुंबईला आल्यावर आम्हा मुलांच्या शिक्षणापायी रिटायरमेंट घेतली. नेव्हीत असताना त्यांनी १९७८ साली पुणे विद्यापीठाकडून ‘शैक्षणिक मानशास्त्र व तत्त्वज्ञान’ या विषयात बीए पदवी घेतली. १९७९ साली बिझनेस मॅनेजमेंटचा कोर्स पूर्ण केला. नंतर आम्ही डोंबिवलीला चाळीत राहायला गेलो. ते दिवस आमचे फारच कठीण होते. दादांनी शिवडीत इंडोबर्मा पेट्रोलियममध्ये नोकरी धरली, पण तिथे त्यांचे पटले नाही म्हणून ती सोडून ठाण्याला स्टाफी कंपनीत नोकरी धरली. पण ती बंद पडल्याने घरी बसण्याची पाळी आली. तेव्हा आम्ही तिघं भावंडं शिकत होतो. वडिलांनी सहज म्हणून एक दुकान चालवायला घेतलं. सुरुवातीचे काही दिवस ते नीट चालेना, त्यातून दुकानाचे भाडेपण सुटेल काही नाही ही शंका येऊ लागली. एक दिवस दादा सकाळी दुकान उघडायला गेले आणि लगेचच परत येऊन गप्प घरात बसले. आम्हाला

कळेना काय झाले ते? आईनी धाडस करून विचारले तर दादा म्हणाले कुणीतरी वारल्यामुळे सगळीच दुकानं बंद आहेत. संध्याकाळी आईने धाडस करून दुकान उघडायला सांगितल्यावर दादांनी दुकान उघडलं आणि त्या दिवशी खूप विक्री झाली. पुढे ते दुकान चांगलं चाललं. दादा तिथे बसून नोकरीसाठी अर्ज लिहीत. अखेर त्यांना सविता केमिकल्समध्ये स्टोअर ऑफिसरची नोकरी लागली. त्यानंतर आईने दुकानाचा ताबा घेऊन चांगलेच चालविले. दादांचा व मोठ्या भावाचा पगार पूर्णपणे बँकेत पडत होता. पुढे दादांनी कळव्याला घर विकत घेतल्यावर दुकान बंद केले. पुढे बहिणीचे लग्न झाले, भाऊ मर्चंट नेव्हीत नोकरीला लागला व मलाही नोकरी मिळाली, पण दादांनी वयाच्या ६२ वर्षापर्यंत नोकरी केली.

रिटायरमेंटनंतर त्यांना घरी स्वस्थपणे बसणे माहीत नव्हते. त्यांचे केस बालपणीच पिकले असले तरी त्यांची तरल आणि चौकस बुद्धी त्यांना आजही स्वस्थ बसून देत नाही. लहानपणी पाटणकर गुरुजींकडे शिकलेल्या भिक्षुकीच्या जोरावर ते आजही मुलुंडपासून डोंबिवलीपर्यंत भिक्षुकी करतात. उरलेल्या वेळात ते कळव्यातील ब्राह्मण सभा, ज्येष्ठ नागरिक संघात आणि सहकार बझार मधील कमिटीवर अशा विविध पदांवर काम करीत असतात. लहानपणी स्वस्थ न बसण्याचा छंद त्यांनी ७५ वर्षांनंतरही जपला आहे. आमचे दादा नास्तिक नाहीत पण देवाचे स्तोम त्यांनी कधीच माजवले नाही. कोणत्याही बुवा किंवा महाराजांचे फोटो देव्हाऱ्यात किंवा घरात त्यांनी आणले नाहीत. अडचणींच्या वेळीही त्यांनी स्वत:वर आणि दैवावर विश्वास ठेवला आणि कठीण प्रसंगांना तोंड दिले. त्यांच्या जीवनात अनेक वादळे आली आणि गेली पण त्यांची नौका मात्र तरंगतच आहे.

**- डॉ. चंद्रशेखर चिंतामणी मराठे**
**(पृ. २४८)**
२०२, सुशील गार्डन-३,
५२ बंगला, जुना ठाणा नाका रोड
पनवेल (जि. ठाणे) नवी मुंबई
मोबाईल : ९८६००२८२३८

## स्वधर्म (‘गीता प्रवचने’ मधून)

अर्जुन अहिंसेचीच काय पण संन्यासाचीही भाषा बोलू लागला होता. ह्या रक्तलांछित क्षात्रधर्मापेक्षा संन्यास बरा असे अर्जुन म्हणतो. पण अर्जुनाचा तो स्वधर्म होता का? ती त्याची वृत्ती होती का? अर्जुनाला संन्याशाचा वेश सहज घेता आला असता, पण संन्याशाची वृत्ती कशी घेता आली असती? संन्याशाच्या नावाने जर तो रानात जाऊन राहता तर तेथे तो हरणे मारू लागला असता. भगवान स्पष्टच म्हणाले, ‘‘अर्जुना, अरे लढाई करणार नाही म्हणतोस, तो तुझा भ्रम आहे. तुझा आजपर्यंतचा बनलेला स्वभाव तुला लढायला लावल्याशिवाय राहणार नाही.’’

अर्जुनाला स्वधर्म विगुण वाटू लागतो; पण स्वधर्म कितीही विगुण असला तरी त्यात राहूनच माणसाने आपला विकास करून घेतला पाहिजे कारण त्यात राहूनच विकास होऊ शकतो. ह्यात अभिमानाचा प्रश्न नाही. हे विकासाचे सूत्र आहे. स्वधर्म मोठा म्हणून घ्यायचा नसतो आणि लहान म्हणून टाकायचा नसतो. वस्तुत: तो मोठाही नसतो आणि लहानही नसतो. तो माझ्या बेताचा असतो. ‘श्रेयान् स्वधर्मो विगुण:’ ह्या गीतावचनातील ‘धर्म’ शब्दाचा अर्थ हिंदू धर्म, मुसलमानी धर्म, ख्रिस्ती धर्म अशासारखा नाही. प्रत्येक व्यक्तीचा धर्म निरनिराळा आहे. येथे माझ्यासमोर असलेल्या दोनशे लोकांचे दोनशे धर्म आहेत. माझाही धर्म दहा वर्षांपूर्वी होता तो आज नाही. आजचा दहा वर्षांनंतर टिकणार नाही. चिंतनाने आणि अनुभवाने वृत्ती पालटत जाते तसतसा पूर्वीचा धर्म गळत जातो आणि नवीन लाभत असतो. हट्टाने काहीच करावयाचे नसते.

दुसऱ्याचा धर्म श्रेष्ठ वाटला तरी तो स्वीकारण्यात माझे कल्याण नसते. सूर्याचा प्रकाश मला प्रिय आहे. त्या प्रकाशाने माझी वाढ होते. सूर्य मला वंद्यही आहे. पण म्हणून मी पृथ्वीवरचे वास्तव्य सोडून त्याच्याजवळ जाऊ पाहीन तर जळून जाईन. उलट पृथ्वीवर राहणे विगुण असेल, पृथ्वी सूर्यापुढे अगदीच तुच्छ असेल, ती स्वयंप्रकाशित नसेल, तथापि जोपर्यंत सूर्याचे तेज सहन करण्याचे सामर्थ्य माझ्यामध्ये नाही तोपर्यंत सूर्यापासून दूर पृथ्वीवर राहूनच मी माझा विकास करून घेतला पाहिजे. माशाला जर कोणी म्हणेल,‘‘पाण्यापेक्षा दूध मौल्यवान आहे. दूधात राहा.’’ तर मासा ते कबूल करील का? मासा पाण्यातच वाचेल, दुधात मरेल.

दुसऱ्याचा धर्म सोपा वाटला म्हणूनही स्वीकारावयाचा नसतो. पुष्कळ वेळा सोपेपणाचा भासच असतो. संसारात बायकामुलांचे नीट रक्षण करता येत नाही म्हणून कंटाळून जर कोणी गृहस्थ संन्यास घेईल, तर ते ढोंग होईल व जडही जाईल. संधी सापडताच त्याच्या वासना जोर करतील. संसाराचे ओझे झेपत नाही म्हणून वनात जाणारा आधी तेथे लहानशी झोपडी बांधील. मग तिच्या रक्षणासाठी तो कुंपण करील. असे करता करता त्याला तेथे सवाई संसार उभा करण्याची पाळी येईल. वैराग्यवृत्ती असेल, तर संन्यासातही कठीण काय आहे? संन्यास सोपा म्हणून सांगणारीही स्मृतिवचने तर आहेतच. पण मुख्य मुद्दा वृत्तीचा आहे. ज्याची जी खरी वृत्ती असेल तदनुसार त्याचा धर्म राहील. श्रेष्ठ-कनिष्ठ, सोपे-कठीण हा प्रश्न नाही. खरा विकास हवा. खरी परिणती हवी.

पण कोणी भाविक विचारतात, ‘‘संन्यास जर युद्ध करण्याच्या धर्माहून केव्हाही श्रेष्ठच आहे, तर भगवंतांनी अर्जुनाला खरा संन्यासी का बनविले नाही? त्यांना काय ते अशक्य होते?’’ त्यांना अशक्य काहीच नव्हते. पण त्यात अर्जुनाचा पुरुषार्थ तो काय राहिला असता? परमेश्वर मोकळीक देणारा आहे. ज्याने त्याने धडपड करावी. त्यातच गोडी आहे. लहान मुलाला स्वत: चित्र काढण्यात आनंद असतो. त्याचा हात धरलेला त्याला आवडत नाही. शिक्षक जर मुलांना भराभर गणिते सोडवून देऊ लागला तर मुलांची बुद्धी कशी वाढणार? आईबापांनी, गुरुंनी सूचना द्याव्या. परमेश्वर आतून सूचना देत असतो. ह्याहून अधिक तो काही करीत नाही. देवाने कुंभाराप्रमाणे ठोकून, पिटून किंवा थापून प्रत्येकाचे मडके तयार करण्यात काय स्वारस्य? आपण मडकी नाही. आपण चिन्मय आहो.

प्रेषक : श्री. वा. ग. मराठे (पृ. ५०३)

कथा

# श्रद्धा

डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ. १२०)

रविवार, सकाळी दहाची वेळ. सुटी असल्याने वसुधाचा दिनक्रम रेंगाळत चालला होता. ती उठलीच मुळी सकाळी आठला. जीवनात कधीही आळसाला थारा देऊ नये असे व्रत घेतलेले तिचे पतिराज सकाळीच फिरायला गेले. त्यामुळे चहा करण्याचीही तिला घाई नव्हती. जाग आली तेव्हा पलंगाजवळच्या खुर्चीवर रविवारची वृत्तपत्रे ठेवलेली तिला दिसली. उठण्याचाही त्रास न घेता तिने ती पडल्यापडल्याच वाचली. आणखी काही वेळ ती तशीच रेंगाळली असती. पण लेकीच्या हाकेने तिला उठावे लागले.

''आई, लौकर इकडे ये. समोरच्या बाबूराव टॅक्सीवाल्याकडे किती गर्दी जमली आहे ते पहा.'' तिच्या मुलीने ब्लॉकच्या पाठीमागील बाल्कनीतून फर्मावले.

''आऽऽई, लवकर ये ना!'' लेकीच्या आणखी हाका येण्यापूर्वीच वसुधा मागील बाल्कनीत गेली.

समोरच्या मैदानात गर्दी जमली होती खरी. बाबूराव टॅक्सीवाल्याभोवती गराडा पडला होता. त्यामुळे लोकांनी कशासाठी गर्दी केली हे तिला कळू शकले नाही. गर्दीच्या पाठीमागे रंगीत युनिफॉर्ममधील दहा-बारा बँडवाले ओळीने उभे होते. आपापली वाद्ये व्यवस्थित आहेत की नाहीत ते पडताळून पाहात होते.

''आई, मी खाली जाऊन बघून येऊ का?'' मीनाने असे विचारले खरे, पण ती आईच्या होकाराची वाट न पाहता खाली निघून गेलीसुद्धा.

वसुधाला ते अपेक्षितच होते. मीना दहा वर्षांची मुलगी असली तरी तिचा स्वभाव आणि वागणे अल्लड मुलाप्रमाणे होते. पोशाखही मुलाप्रमाणे, केस बॉयकट पद्धतीने कापलेले, शेजारच्या मुलांबरोबर क्रिकेट, टेनिस, हुतूतू, खो-खो असे खेळ खेळायची. अलीकडच्या शहरी वातावरणात त्यात काही वावगे नव्हते.

त्यातून वसुधाची एकमेव अपत्य. 'हम दो, हमारे दो' चा काळ मागे पडला आहे. वसुधाने हेतूत: तिला मुलाप्रमाणेच संगोपन केले. 'मुलगाच हवा' अशी भावना उरलेली नाही.

....आता वसुधाचा दिवस सुरू झाला. स्वयंपाकघरात येऊन तिने चहा केला आणि सवयीप्रमाणे स्वयंपाकाच्या तयारीला लागली.

काम करीत असताना मधूनच मनात विचार येई. बाबूराव टॅक्सीवाल्यासमोर कशासाठी बरे गर्दी जमली असेल? परंतु उत्सुकता फार नव्हती. बाल्कनीत पुन्हा जाऊन बघण्याचे कष्टही तिने घेतले नाहीत. मीना तिथून परतल्यावर सांगेलच, या विचाराने ती शांत होती.

...नकळत तिच्या मनात मात्र बाबुरावचा विषय रेंगाळत होता. गेली सुमारे पंधरा वर्षे ती बाबुरावला दुरून का होईना ओळखत होती. त्याच्या स्वभावाचे आणि विचाराचे काही पैलू तिला माहीत झाले होते. कारणपरत्वे बाबुरावच्या टॅक्सीचा वापर ती करीत असे. तिच्या अनुभवानुसार बाबुराव एक भला माणूस होता. टॅक्सीवाला असला तरी त्याची स्वत:ची अशी ठाम मते होती. मुंबईतील दादरसारख्या परिसरात सर्वत्र ओनरशिप फ्लॅटसच्या सोसयट्या झाल्या असल्या तरी अपवादानेच दिसत असलेल्या पूर्वीच्या वाडीत बाबुरावचे घर होते. वसुधाच्या गॅलरीतून ते थेट दिसे. वाडीतील अन्य घरांची नवीन बिल्डिंग्जमध्ये रुपांतरं झाली होती. बाबुरावचे घर आणि समोरील थोडीशी जागा मोकळीच होती. कुंपण नव्हते. घराजवळ माडाचे एक उंच झाड होते. दरवाज्याच्या एका बाजूला दोन-तीन फुलझाडांच्या कुंड्या, एक पारिजातकाचे, कर्दळीचे व सदाफुलीचे एक एक झाड होते.

उरलेल्या मोकळ्या जागेत बाबुरावाची ॲम्बेसिडर टॅक्सी सकाळी उभी असलेली दिसायची. सकाळी सात ते सायंकाळी सात ह्या बारा तासात बाबुराव टॅक्सीचा धंदा करी. संध्याकाळी परतल्यावर त्याने रात्रीची टॅक्सी बाहेर काढलेली तिला माहीत नव्हती. कारण बाबुरावचा तसा निश्चय होता. सायंकाळी परतल्यावर तो कुटुंबात रमत असे. कितीही पैसा मिळाला तरी रात्री टॅक्सीचा व्यवसाय करायचा नाही असे त्याने ठरवले होते. मात्र माणुसकी म्हणून जवळच्या आजारी माणसाला दवाखान्यात, हॉस्पिटलमध्ये पोहोचवायची वेळ आली तर बिनातक्रार तो ते काम करीत असे.

सायंकाळी घरी परतल्यावर बाबुराव हात-पाय धुवून लगेच टॅक्सी पुसायला घेई. बारीक-सारीक आवश्यक ती दुरुस्ती स्वत:च करीत असे. मग तो अंघोळ करून दरवाज्यासमोरील अंगणात आरामखुर्ची टाकून आराम करीत असे.

वसुधा ऑफिसमधून परतल्यावर विरंगुळा म्हणून मागील बाल्कनीत उभी असायची. मनात वेगळे विचार असताना नकळत समोरच्या बाबुरावाचे घर-अंगण तिला दिसत असे. अनेक वर्षांच्या या सवयीने तिला दुरून का होईना, बाबुरावाच्या व्यक्तिमत्त्वाचे काही नेमके दर्शन घडले होते.

बाबुराव असा आरामखुर्चीत पहुडलेला असाताना त्याची बायको लक्ष्मी स्टूल आणून ठेवायची. पाठोपाठ एक ग्लास, मद्याची बाटली आणि बाऊलमध्ये बर्फ आणून ठेवायची. बाबुराव नियमितपणे मद्य घेत असे परंतु मर्यादित. घरी कधी तो झिंगलेला दिसला नाही की नशेत कधी भांडण केल्याचे ऐकिवात आले नाही.

रात्री साडेआठ वाजल्यानंतर तो घराबाहेर कधी आलेला दिसला नाही.

नेकीने टॅक्सीचा व्यवसाय करणाऱ्या बाबुरावला चांगले दिवस आले. त्याला दोन मुलगे होते. मुलांना चांगल्या नावजलेल्या शाळेत घातले. शिकवणीही लावली. तो आणि लक्ष्मी अशिक्षित असल्यामुळे मुलांचा अभ्यास घेणे त्यांना शक्य नव्हते. तरीही मुलांनी खूप शिकून मोठ्या अधिकाऱ्याच्या नोकऱ्या करून समाजात चांगली प्रतिष्ठा मिळवावी अशी तीव्र इच्छा होती. सुदैवाने मुलेही हुशार निघाली. मुलांच्या शिक्षणाला पैसा कमी पडू नये म्हणून बाबुरावाने

आणखी तीन मोटारगाड्या घेतल्या आणि त्या लक्झरी टॅक्सी म्हणून कराराने वापरण्यास मोठ्या कंपन्यांना दिल्या. त्यामुळे त्याचे उत्पन्न नियमितपणे वाढत होते. मुलांची शिक्षणे सुरळीतपणे पार पडली. मोठा आर्किटेक्ट झाला. त्यानेही स्वतंत्र व्यवसायात जम बसविला. स्वत:साठी नवी मारुती कार घेतली. धाकटा मुलगाही मागे राहिला नाही. बी.कॉम झाल्यानंतर आवश्यक डिप्लोमा मिळवून त्यानेही सेल्सटॅक्सची प्रॅक्टीस सुरू केली आणि थोड्या अवधीत त्यानेही मारुती घेतली.

आता दोन्ही मुलांची लग्ने लावून सुना आणायची घाई लक्ष्मीला झाली होती. बाबुरावाचाही त्या गोष्टीला विरोध नव्हता. मात्र विरोध होता तो त्या मुलांचाच. समाजातील त्याचे 'स्टेटस्' वाढले होते. व्यवसायानिमित्ताने त्यांच्या अनेक घरंदाज श्रीमंत कुटुंबीयांशी ओळखीही झाल्या होत्या. अशा परिचित मंडळींकडून त्या मुलांसाठी आडवळणाने चांगली ठिकाणे सांगून येत. परंतु दोघा भावांनी मात्र अजून काही काळ कर्तव्य नसल्याचे सांगितले. त्यांच्या महत्त्वाकांक्षा वाढल्या होत्या. दादरमध्येच दोन चांगले स्वत:च्या मालकीचे फ्लॅट घेतल्यावरच विवाह करण्याचे त्यांनी ठरविले होते. आणि त्यासाठी लागणारी मोठी रक्कम उभी करण्यास काही काळ थांबणे आवश्यक होते. मुलांच्या मनात आणखीही एक शल्य नकळत वाढत होते. त्यांनी स्वकर्तृत्वावर आपापल्या व्यवसायात चांगले कमावले होते तरी प्रतिष्ठित समाजात ज्येष्ठ मंडळी त्यांना 'बाबुराव ड्रायव्हरची मुलं' म्हणून ओळखीत होते. त्यांच्या यशाचे सर्व श्रेय बाबुरावच्या उमद्या स्वभावाला आणि प्रामाणिक कष्टाळू जीवनाला देत होते. बाबुरावाने अतिशय कष्टाने, काटकसरी राहणीने मुलांना मोठे केले असेच सर्वजण म्हणत.

प्रथम प्रथम मुलांनाही त्यात काही वावगे वाटत नसे. परंतु पुढे मात्र त्यांना वडिलांचा बाबुराव ड्रायव्हर असा होणारा उल्लेख खुपू लागला. मुलांनी ठरवले की वडिलांना यापुढे टॅक्सी चालवू द्यायची नाही. पण तसे स्पष्टपणे सांगण्याची त्यांची हिंमत नव्हती. त्यांना वडिलांचा 'बाबुराव ड्रायव्हर' असा उल्लेख खुपत असे. स्वत: बाबुरावाला मात्र त्याचा अभिमान वाटत असे. त्याला समर्पक कारणही होते. त्याच्या वयाच्या परंतु आर्थिकदृष्ट्या आणि सामाजिक प्रतिष्ठेतही पुढारलेल्या अनेक परिचित मंडळींची पुढील पिढी व्यसनाधीन आणि नाकर्ती निघालेली होती.

आपल्या सचोटीच्या आणि मेहनतीच्या तपश्चर्येमुळे आपली मुले अधिक सुशिक्षित, यशस्वी व्यावसायिक आणि सुसंस्कृत झाली अशी त्याची श्रद्धा होती. या पार्श्वभूमीवर त्याच्या मुलांनी वेगळीच शक्कल लढवली.

त्यांनी प्रथम आईला पटवून सांगितले की, बाबांनी आता टॅक्सी चालविण्याची गरज नाही. उमेदीच्या जीवनात त्यांनी अतिशय कष्ट घेतले. आता विश्रांती घ्यावी. लक्ष्मीलाही ते पटले. त्यांनी बाबुरावला तसा आग्रह केला.

खरे तर त्यात काही वावगेही नव्हते, परंतु बाबुरावला मात्र ही कल्पना अजिबात मान्य झाली नाही. एरव्ही शांत असणाऱ्या बाबुरावाने ताडकन उत्तर दिले, ''अंगात शक्ती असेल तोपर्यंत मी टॅक्सी चालविणं बंद करणार नाही. या टॅक्सी व्यवसायामुळेच माझी भरभराट झाली, अशी माझी श्रद्धा आहे.''

''मी मेल्यावर या आवडत्या टॅक्सीतून माझी अंत्ययात्रा निघाली पाहिजे. ही माझी शेवटची इच्छा आहे.''

''असं काय भलतंच अभद्र बोलायचं तिन्हीसांजच्या वेळेला?'' लक्ष्मी म्हणाली.

या उत्तरावर तो संवाद तेथेच थांबला.

असेच काही दिवस गेले. मात्र बाबुरावने आपला टॅक्सी व्यवसायाचा वेळ थोडा कमी केला होता. फुरसतीच्या वेळात तो आजूबाजूच्या मंडळीत मिसळू लागला. मुळात तो मितभाषी. नक्की कारण सांगता येत नाही, परंतु बाबुरावाबद्दल आम्हा उभयतांचे मत जसे चांगले होते तसे आमच्या विषयीही असावे. म्हणून तो अधूनमधून घरगुती गोष्टी सांगे.

बाबुरावच्या वाडीपासून हाकेच्या अंतरावरच एक नवीन सोसायटी उभी होत होती. त्यातले दोन फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध होते. बाबुरावच्या मुलांनी ते विकत घेण्याचे ठरविले आणि अल्पावधीतमोठी रक्कम उभी करण्यासाठी सर्व प्रकारची धडपड सुरू केली. मुलांनी पुन्हा आईला गळ घातली. स्वत:ची टॅक्सी व इतर तीन लक्झरी टॅक्सीज विकून रोख रक्कम उभी करण्यास सांगावी.

या वेळी लक्ष्मीने मुलांसाठी नवे फ्लॅटस घेण्याची आवश्यकता बाबुरावच्या गळी उतरविली, ''स्वत:चे फ्लॅटस झाल्यावरच मुलांनी लग्न करण्याचे ठरविले आहे. मुलांचे संसार उभे करून देणे हेही आपले कर्तव्यच नाही काय?''

लक्ष्मीचे म्हणणे बाबुरावला पटले. त्याने तीनही लक्झरी टॅक्सीज विकून आलेली रक्कम मुलांच्या हवाली केली. आणखीही काही रक्कम त्याने परिचितांकडून मिळवून दिली. मात्र स्वत: चालवत असलेली टॅक्सी राखून ठेवली. मुलांनी सोसायटीत तयार होऊ घातलेले फ्लॅटस स्वत:च्या नावे विकत घेतले.

आता खऱ्या अर्थाने बाबुरावाने आपल्या संसाराची जबाबदारी पूर्ण केली होती. मनानेही त्याने निवृत्ती स्वीकारली. व्यवसाय म्हणून नव्हे तर आपल्या पूर्वीच्या मित्रमंडळींना भेटण्यासाठी किंवा कधी लक्ष्मीसह फिरून येण्यासाठी तो आपली टॅक्सी चालवित असे.

लक्ष्मीच्या समाधानालाही पारावार नव्हता. उत्साहाने तिने मुलांच्या सोयरीकीसाठी प्रयत्न चालविले होते. दोन्ही मुलांचे विवाह एकदमच करण्याचे ठरविले होते.

बाबुराव मात्र अलीकडे विरक्तीच्या मार्गाला लागला होता. त्याचा दिनक्रमही पार बदलल होता. माळकरी झाल्याने पूजा-अर्चा आणि सायंकाळी देवदर्शन घेणे त्याने सुरू केले होते.

क्वचित होणाऱ्या त्याच्या भेटीत तो आता काही भजनी मंडळींचे आणि काही लोकप्रिय प्रवचनकारांचे कौतुकही सांगत असे. पण विशेष गोष्ट अशी की, मुलांना लवकरच मिळणाऱ्या फ्लॅटच्या ताब्याचा विषय कधी काढलाच तर त्यावर तो अजिबात बोलत नसे. खुणेनेच तो आपले छोटेसे कौलारू घर आणि समोरील टॅक्सी दाखवी आणि हात जोडून याच गोष्टी आपल्या परमेश्वर असल्याचे सुचवित असे.

अलीकडे महिन्या दीड महिन्यात बाबुराव कधी दिसलाही नव्हता.

एकीकडे मंद गतीने का होईना माझी घरातली कामं चालू होती. मनात मात्र बाबुरावाचा विषय तपशीलवार उलगडत होता. इतक्यात बँडवादन जोरात सुरू झालो. 'रघुपति राघव राजाराम'ची धून सुरू झाली. त्या आवाजाने आणि उत्सुकतेने

मी मागील बाल्कनीत आले.

समोरचे दृश्य बघून थक्क झाले. बाबुरावांची टॅक्सी गुलाबाच्या फुलांच्या हारांनी सजवली होती. मात्र तिचे वरचे टप पूर्णपणे काढल्याने ड्रायव्हरच्या जागेवर, आता एका आराखुर्चीवर फुलांनी मढविलेला बाबुरावचा देह विराजमान झाला होता. बाजूला दोन्ही मुलगे खुर्ची सावरीत उभे होते. टॅक्सीच्या मागे शे-दीडशे लोक होते. रामधून वाजवीत बँडवाले लोक चालू लागले. श्रीराम जयराम ... च्या घोषात बाबुरावची टॅक्सी लोक ढकलीत पुढे नेत होते. बाबूरावची अंतिम इच्छा पूर्ण झाली होती.

**- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**
(संपादिका : हितगुज - मराठे प्रतिष्ठान)
८/१३, सहकार नगर,
वडाळा, मुंबई ४०० ०३१

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शुक्रवार दिनांक ३ सप्टेंबर २०१० ला दुपारी ४ वाजता मराठे प्रतिष्ठान कार्यकारी मंडळाची सभा, मराठे उद्योगभवनात भरली.

मागील सभेचे इतिवृत्त वाचले. पत्रव्यवहारावर चर्चा झाली आणि वार्षिक सर्वसाधारण सभेचा खर्च मंजूर करण्यात आला. या बैठकीत श्री. प्रभाकर मराठे यांनी कोषाध्यक्षपदाचा राजीनामा देणार असल्याचे सांगितले.

श्री. सुरेश मराठे, डोंबिवली हे बँकेतून निवृत्त झाल्यामुळे प्रतिष्ठानच्या कामात सहभागी होऊ शकतील असा मनोदय त्यांनी व्यक्त केला. श्री. सुरेश वामन मराठे, ठाणे हे कोषाध्यक्षपदाची धुरा सांभाळण्यास तयार झाले. श्री. रमाकांत विद्वांस व श्री. मोहनराव मराठे यांच्या वाढदिवसानिमित्त सर्वांनी त्यांचे अभिष्टचिंतन केले आणि केक कापला. (आनंदरावांनी खास तो आणला होता.) विशेष म्हणजे डोंबिवलीचे श्री. सुरेश मराठे यांच्या पत्नी आणि मुलगी मीटिंगला आल्या होत्या. चहापानानंतर बैठक संपली.

---

सोमवार दिनांक ११ ऑक्टोबर २०१०ला, ललितापंचमीच्या दिवशी मराठे प्रतिष्ठानची बैठक कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांचे वडीलबंधू श्री. शरद मराठे, गोरेगाव यांच्या निवासस्थानी दुपारी ४ वाजता भरली. हेमंत मराठे प्रकृती अस्वास्थामुळे आणि डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिल्यामुळे त्यांच्या भावाकडे राहायला आले आहेत म्हणून बैठकही तिथे भरविण्यात आली.

मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविण्यात आले. हितगुजचा छपाईखर्च मंजूर करण्यात आला. प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती सुलभाताई मराठे यांनी मराठे प्रतिष्ठानसाठी पूर्वी काम करणारे मराठे परिवारातील सदस्य यांच्या काही आठवणी सांगितल्या. सी. गो. खांबेटे यांनीही त्यांच्या समकालीन मराठे परिवाराच्या व्यक्तींविषयी खुशाली आणि कार्य सांगितली. श्री. शरद मराठे यांनी कर्नाटकातील दुर्ग येथे मराठे परिवाराचे संमेलन झाले होते त्याची सुंदर सीडी काढली होती. त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. वर्षा मराठे यांनी नवरात्रात कोणाचा उपास असला तर (सुलभाताईंचा होता) म्हणून गरमागरम खुशखुशीत केलेले साबुदाणे वडे आणि नारळाची चटणी आग्रहाने सर्वांना वाढली. त्यांच्या घरी नवरात्र होते, देवीचा प्रसाद म्हणून स्वादिष्ट गोड खीरही दिली. सौ. वर्षाताईंनी प्रतिष्ठानसाठी काही काम करत नाही मग कार्यकारिणीवर कशाला राहायचे याचा त्यांना संकोच वाटल्याचे सांगितले त्यावर सी. गो. खांबेटे, आणि संपादिका गमतीने म्हणाल्या, ''वर्षातून तुम्ही अशी एक बैठक घरी बोलावून आदर-सत्कार केला तरी पुष्कळ झाले की''

भाउ-भावजय घेत असलेली हेमंतची काळजी आणि त्यांचा पाहुणचार पाहून सर्वांची मने भारावून गेली.

**'हितगुज'साठी जाहिराती द्याव्यात**

अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, साठावा वाढदिवस, अमृतमहोत्सव, सहस्त्रचंद्रदर्शन या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन 'हितगुज'ला सहकार्य करावे.

पाव पान रु. ६००/-
अर्धे पान रु. १,२००/-
पूर्ण पान रु. २,५००/-

रक्कम 'मराठे प्रतिष्ठान' नावाने मुंबईतल्या पत्त्यावर चेकने पाठवावी.

# अभियंता श्री. वि. म. मराठे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान

सांगली येथील आपले कुलबांधव निवृत्त कार्यकारी अभियंता श्री. वि. म. मराठे (पृष्ठ क्र. २३५) यांना दिनांक १५ सप्टेंबर २०१० ला अभियंता दिनी रोटरी क्लब ऑफ कृष्णाव्हॅलीतर्फे Lifetime Achivement Techonocrat Award- जीवनगौरव पुरस्कार सांगलीचे महापौर इंजिनियर सावगावे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्रक आणि रु.५००१/- असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सामाजिक उपक्रमात अग्रेसर असणारे अभियंता कै. टी. के. पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त हा पुरस्कार दिला जातो. श्री. वि. म. मराठे यांचे मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक अभिनंदन. त्यांच्या कन्या सौ. विद्या वैशंपायन यांची कविता प्रसिद्ध करीत आहोत. या कवितेतून त्यांच्या गौरवगाथेचा परिचय होईल.

*या वर्षाचा गणराय घेऊन आला बातमी आनंदाची*
*रोटरी क्लबने सन्मानासाठी केली निवड माझ्या वडिलांची ।*

*या प्रसंगी अभिमानाने त्यांचे हार्दिक अभिनंदन करते*
*अभियंता दिनी त्यांच्या गौरव गाथेचा थोडक्यात आढावा घेते ।*

*जपत सचोटी सत्यता सरकारी सेवा केली*
*अनुभवाचा ठेवा घेऊन निवृत्ती स्वीकारली*
*समाज ऋण फेडण्या व्रत समाजसेवेचे घेतले*
*रेन हार्वेस्टिंगचा प्रचार करत भान पर्यावरणाचेही राखले ।*

*कार्याचा प्रवास त्यांचा येथेच नाही थांबत*
*साहित्य देवतेचीही उपासना चालू असते सतत ।*

*प्रेमाची देवाण घेवाण करत बनले मित्र जगाचे*
*यासमयी नको विस्मरण पत्नीच्या योगदानाचे ।*

*सिद्ध झाले आज सत्कार्यासाठी नसते मर्यादा वयाची*
*पुरे फक्त मदतीची तळमळ आणि उभारी मनाची ।*

*वसुधैव कुटुंबकम मंत्र त्यांनी सतत ऊरी जपला*
*इतके वर्षांची तपस्या आज आली फळाला ।*

*टी. के. पाटील पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली*
*कर्मण्येवाधिकारस्तेची आज प्रचिती आली ।*

*खऱ्या रत्नाची पारख रत्नपारख्यांनाच होते*
*रोटरी क्लबला मनापासून धन्यवाद देते ।*

**- सौ. विद्या वैशंपायन, पुणे (पृ. क्र. २३५)**
(श्री. वि. म. मराठे यांची कन्या)
भक्ती अपार्टमेंट, विमल विहारच्यामागे, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७
दूरध्वनी : ०२० -२४२१६३७२

## श्री. वि. म. मराठे, निवृत्त अभियंता यांचा परिचय

| | | |
|---|---|---|
| नाव | : | श्री. विठ्ठल महादेव मराठे |
| जन्मतारीख | : | २८-११-१९३४ |
| शिक्षण | : | डी.सी.ई. १९५७ |
| सेवेचे तपशील | : | ओव्हरसियर ते कार्यकारी अभियंता या पदांवर १९९२ पर्यंत सेवा त्यामध्ये मुळाधरणावर १९६८ पर्यंत सर्व्हेपासून अवजड यंत्र सामुग्रीने मातीच्या धरणाच्या बांधकामात विशेष प्राविण्य, आपत्कालीन व्यवस्थेच्या कामात रस घेऊन प्राविण्य, वैतरणा धरणाच्या मातीकामासाठी मुद्दाम नियुक्ती, कोयना प्रकल्प तिसरा टप्पा, अलोरे येथे भूसंपादन तसेच १९६७ च्या मोठ्या भूकंपानंतर अलोरे येथे मोठ्या प्रमाणावर खात्यामार्फत इमारती बांधकाम वेळेत केले. तसेच अवजल कालव्याचे कामही केले. त्यानंतर गुण नियंत्रण विभाग, इस्लामपूर येथे वारणा प्रकल्पाचे गुणनियंत्रण केले. जिल्हा परिषद कोल्हापूर येथे कार्यकारी अभियंता लघु जल सिंचन विभागात काम करताना ग्रामीण पाणीपुरवठा कामांबद्दल प्रथम क्रमांक! ''डिसेंबर १९९२ मध्ये निवृत्त'' : १९९८ निवृत्त अभियंता मंडळाची स्थापना व त्या मंडळाचा संस्थापक अध्यक्ष व त्यानंतर सहा वर्षे अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली. निवृत्त अभियंत्यानी आपल्या अनुभवाचा लाभ समाजाला द्यावा हा मंडळाचा उद्देश, रेन वॉटर हार्वेस्टिंगचा प्रसारव मार्गदर्शन, १० ठिकाणी काम करवून घेतले. पवनचक्कीचा व पाऊस न पडण्याचा संबंध नाही या विषयावर वृत्तपत्रातून लेखन,ज्येष्ठ नागरिक संघाच्या स्थापनेमध्ये व कार्यात विशेष सहभाग, निरनिराळ्या दिवाळी अंकातून प्रसिद्ध झालेल्या कथांचा जीवनधारा हा १६ कथांचा कथासंग्रह प्रा. हातकणंगलेकर यांच्या हस्ते प्रसिद्ध. ''जीवनधारा'' या कथेस उत्तमकथेच्या स्पर्धेत पारितोषिक मिळाले होते. बऱ्याच कविता प्रसिद्ध, ''लाचेची वाटचाल'' या कवितेस २००९ च्या ''लोकमत'' दिवाळी अंकाचे प्रथम पारितोषिक, कथा, कविता, लेखन, हितगुजमध्ये लेखन चालूच आहे. सामाजिक प्रश्नांना वृत्तपत्रातून, लोकशाही दिनांतून तसेच माहिती अधिकारातून वाचा फोडण्यात येते. अन्याय, भ्रष्टाचार याबद्दल मनस्वी चीड! यासाठी कोणाबरोबरही जाण्यास तयारी. |

# माझ्या सुखाच्या कल्पना

**सौ. श्यामला पुरंदरे (जाईल)**

माझी बालमैत्रीण उषा सामंत हिचा जागतिक पर्यटन दिनाच्या भल्या पहाटे केरळहून फोन आला, 'श्यामे, मी वायनाड इथल्या २०० वर्षांपूर्वीच्या महाकाय वडावरील ट्री हाऊसवर आहे. चोहोबाजूंना हिरव्यागार झाडांची एकच दाटी... स्वच्छ पानांवरून खाली थेंब थेंब ओघळणारं पारदर्शक पाणी... त्याचा मंजुळ खळखळाट.. पक्ष्यांचा किलबिलाट... तू इथे असतीस तर अजून मजा आली असती बघ.''

मजा वाटणे म्हणजेच सुख वाटणे, हो ना? जीवनाच्या विविध टप्प्यात सुखाच्या कल्पना बदलतात. माझी सुखाची व्याख्या म्हणजे जेव्हा आपलं मन प्रसन्न होतं, तेव्हा भोवताली बघण्याची दृष्टीच बदलून जाते व चिंचेचा वृक्ष चिनार भासायला लागतो.

मानवी मन अत्यंत संवेदनाशील व अस्थिर असतं, त्याला काबूत ठेवण्यासाठी सुंस्कारित बुद्धीची गरज आहे, मग मी बौद्धिक क्षमता वाढविण्याचे अनेक मार्ग शोधायला लागते. थोडक्यात काय तर सुखी राहण्याचा आटोकाट प्रयत्न करते. साने गुरुजी म्हणत की जे काम कराल ते मन लावून करा. मला स्वयंपाकघरात काम करायला आवडतं. मुंबईहून सुट्टीसाठी नातवंडे आल्यावर त्यांची फर्माईश पुरी करताना कृतकृत्य वाटतं. सिनिअर सिटीझन संघाचे सभासद मीटिंगसाठी घरी येतात तेव्हा हौसेनं त्यांना खाऊ घालते. आमच्या 'लाफ्टर क्लब'जे मित्र-मैत्रिणी जेव्हा वाढदिवसानिमित्त घरी जेवायला येतात, तेव्हा मनापासून आनंद होतो. भिशीचा ग्रुप जेव्हा एकत्र जमतो तेव्हा सांबारे वहिनीसमवेत काहीतरी वेगळे पदार्थ करताना मजा येते. तितकंच मी एन्जॉय करते आशा शशिकांत जोशीनं दिलेलं लिंबाचं गोड लोणचं चाखताना, येलुरकर वहिनींचा उकडीचा मोदक खाताना, मावससासूबाई ताई-मावशी यांची मोहरीत फेटलेली मिरची तोंडात घातलाना व आईने केलेल्या दशमीची चव जिभेवर अजून रेंगाळतेय. अशीच गमत आली होती बहिणी-बरोबर कॅलिफोर्नियामध्ये गार्लिक फेस्टिवलला गेल्यावर पारीख भाभींचा उंधियो वर ताव मारताना. लहानपणी तिन्हीसांजा झाल्यावर आम्ही तीनही भावंडं देवासमोर हात जोडून शुभं करोति म्हणत असू. त्यातील आरोग्यं धनसंपदा ह्रदयाच्या चारही कप्प्यात कायमचं कोरलं गेलंय. त्या वेळी रोज सायंकाळी व्यायाम शाळेत जाऊन खतिजा व्होरा, चंद्रकला शेणई, कुंदा सोमण, उषा बाठिया इत्यादी मैत्रिणींबरोबर लेझीम, लंगडी, दोरीच्या उड्या, मलखांब खेळल्यावर शेवटी उंच झोका घेत मनसोक्त गाणी म्हणायची हौस भागवून घेत होते. आता सकाळी ६.१५ वाजता चैतन्य हास्य मंडळात जाऊन सोसतील व जमतील असे व्यायाम करते. आम्ही सर्वजण सुखाने दिवसाला सुरुवात करतो, एकमेकांची सुखंदु:खं शेअर करतो, एकमेकांचे वाढदिवस उत्साहाने साजरे करतो, खुस्पेवहिनींचं काव्य मनापासून ऐकतो व शिंदे सरांच्या मदत करण्याच्या वृत्तीला दाद देतो आणि जोशीसरांचा वक्तशीरपणा वाखाणतो. शिवाय स्नेहा हिरवानीची प्रशंसा करतो तिच्या भूतदयेबद्दल.

बाबा रामदेव यांचे प्राणायाम आणि बी.के.एस. अय्यंगार गुरुजी यांचे आसने केल्यावर खूप ताजंतवानं वाटतं. संध्याकाळी एक तास फिरून आल्यावर शरीर व मन एकदम फीट न राहिलं तरच नवल!

फिल्ड मार्शल सॅम माणकेशाँ सैनिकांना सांगत, ''गड्यांनो, कूल राहा म्हणजे तुम्ही नक्कीच विनर व्हाल.'' डोकं शांत राहण्यासाठी मी 'ज्ञानेश्वरी' व पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या 'स्वाध्याय' उपक्रमाला जाते. आमचं वृंदावन भजन मंडळ आहे. परमेश्वराशी अशाप्रकारे सुसंवाद करण्याचा प्रयत्न केल्यावर स्वर्गीय सुख मिळतं. असंच सुख मिळत सुषमा जोगळेकर, जयश्री लिमये व शांता मोकाटे यांच्या 'शरदिनी'चा कार्यक्रम ऐकल्यावर आणि उषा रामस्वामी व सुलोचना हांडे यांची 'तरंगिनी' आनंदाचे तरंग निर्माण करते.

मला आवडणाऱ्या व्यक्तिंतशी संपर्क साधल्यावर खूप छान वाटतं. कधीतरी ललिता पटवर्धनचा अमृतवेल मधील 'गझल' टीव्हीवर बघते. संदेशा छाजेडला ईमेल पाठवते, औंधभर सायकलिंग करणाऱ्या नीला पंडीतच कौतुक करते. शशि भिडेला वाढदिवसाच्या शुभेच्छा देते, सुधा बेडेकरशी फोनवर गप्पा मारते, निवाऱ्यात जाऊन दुसऱ्यासाठी स्वत:चा वेळ देणाऱ्या किशोरी प्रसादबद्दल अभिमान वाटतो. हुद्दार वहिनींची विचारपूस करते, पूर्वीसारख्याच सुंदर दिसणाऱ्या अंजली जोग, सुमीता नंदी व अरूणा नाडकर्णी यांना मनसोक्त दाद देते.

नातेवाईकांबद्दल बोलायंच तर प्रेमाकाकू, नाना काका व शालिनीकाकू तसंच विनयाकाकू यांचं सात्विक व्यक्तिमत्त्व भावतं, माझी मोंठी बहीण कॉम्प्युटर विजर्ड शकुंतला अत्रे हिच्या अमाप उत्साहापासून स्फूर्ती घ्यावी तितकी कमीच; माझी वहिनी नीलिमा जाईल हिच्या कर्तृत्वाने डोळे दिपतात. मोठी मुलगी डॉ. अपर्णा लिमये हिचा मासिकामधील इंटरव्ह्यू वाचल्यावर तिच्या बुद्धीचं चीज झाल्याचं वाटतं, तर धाकटी पल्लवी हिने वेळोवेळी लिहिलेले J.N.Petit School monthly Snippets वाचून तिच्या पाठीवरून शाबासकीचा हाात फिरतो. नात अनिका हिच्या लाडं लाडं व गोड बोलण्याने जीव सुखावतो व नातू रोहन जेव्हा पुणे आजोबांशी विमानाच्या, बोटीच्या ऐसपैस गप्पा मारतो तेव्हा या चिमुरड्याला कुठे ठेवावं असं होतं.

माझे शेजारीपण असेच सुखदाई आहेत. मोलिना प्रधान तिच्या वांगणीच्या फार्महाऊसला येण्याचं आम्हा उभयतांना खास निमंत्रण देते, एम.एम देशपांडे मॅडम खारहून मुद्दाम इकडे भेटायला येतात, सुमित्रा गावणेकरचा कामाचा सपाटा पाहून मन अचंबित होतं. शकू भावेची अफाट बुद्धिमत्ता पाहून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करावासा वाटतो, प्रविणा जगतापचा सरळ स्वभाव मोहीत करतो तर आशा विलास

जोशीचा कोमल स्वर आनंदाच्या लहरी उठवत.

अशीच सुखाची पर्वणी होते तऱ्हेतऱ्हेचं वाचन करताना, आचार्य अत्रे यांचा 'मराठा'मधी अग्रलेख अंगावर रोमांच खडे करीत असे; डॉ. रवी बापट यांचं वॉर्ड नं. ५, पी.सी.अलेक्झांडर लिखित 'इंदिरा अंतिम पर्व', अच्युत गोडबोले यांचं किमयागार, उत्तिष्ठित जाग्रत मासिकातून येणारं शरदिनी डहाणूकर यांचं निसर्ग वर्णन व रमेश देव यांचं 'या सुखांनो या' हे आत्मचरित्र वाचून सुख आपल्या दारीच आलंय अशी खात्री पटते. पनवेल येथे शिकत असताना वर्गाचं हस्तलिखित मासिक निघे. त्यात खारीचा वाटा स्नेहलता, मेघना जोशीसह उचलताना खूप मजा येई. पुढे मुंबईत नोकरी करत असताना दादरच्या किंग्ज जॉर्जचे गुरुकुल, न्यू इंग्लिश स्कूल बांद्रा (पू) चे वैखरी, केबल कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे वाहिनी, गीताताई नेनिगहाळ यांची सखी, कोथरूडचे स्वानंद, सकाळचे मुक्तपीठ, सविता भावे संपादित उत्तररंग, श्री. मोहन धारियांची वनराई, पंचवटी ज्येष्ठ नागरिक संघाचा अंक यातून थोडीशी साहित्यसेवा करताना निर्भेळ हर्ष मिळतो. असाच हर्ष होतो सायको, मादागास्कर, दो आँखें बारह हाथ, श्यामची आई, शेवग्याच्या शेंगा, बालिका वधू, चारूलता, वीर सावरकर, ध्यासपर्व, स्वदेस, तारे जमींपर व मुंबई मेरी जान चित्रपट बघताना. यातील काही चित्रपट मनास अंर्तमुख करतात तर काही निखळ आनंद देतात. बुनियाद, हमलोग, लीड इंडिया सारखे टीव्ही प्रोग्रॅम विचारांना योग्य दिशा दाखवितात.

बालपणी विजया वाड बरोबर परडी घेऊन फुले वेचण्याचा छंद जडला. आता देखील मी विविध सुवासिक फुलांनी घर नटविते. उर्मिला कुलकर्णींची गच्चीतील बाग मोहून टाकते तर गीता पिंपरीकर, योगेश्री फडके व हरिणी अय्यंगारची टवटवीत फुले मरगळलेल्या मनाला उभारी आणतात. टापटीपणे व नीटनेटके राहण्याचर खूप हौस असल्याने ललिता खंडकर, सिंधू जोशी व मराठे ताई यांचं व्यक्तिमत्त्व प्रसन्नता आणतं. मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो चंद्रशेकर हरि जोशी व विजया अरविंद जोशी ज्यांनी पुणं स्वच्छ करण्याचा वसाच उचललाय. मधूनच चिन्मय मिशनचे शैलेश चैतन्यांची व्याख्याने, 'गोकुळ' वासी अण्णा जोशी यांनी आयोजित केलेले कथाकथन, पं. संजीव अभ्यंकरचा भाव भजन सोहळा, सुधीर गाडगीळ यांनी घेतलेली निळू फुले व जब्बार पटेल यांचर खुसखुशीत मुलाखत, निरू सवदी बरोबर केलेली औषधांबाबतची चर्चा या सर्व घटनांनी दिल एकदम खूश हो जाता है।

मुंबईत शिक्षकी पेशात असताना मिलिंद गुणाजी, सचिन तेंडुलकर, चक दे इंडिया फेम विद्या माळवदे, वासुदेव बळवंत फडके मधील आदिती भागवत, शर्मिला मधुकर तोडरमल, मनिषा के. पुरोहित, डॉ. दिपाली बाळ फोंडके, शर्वरी कुलकर्णी, शेफाली अरुण साधू, पंकज पोकर्णा, अभिजित बिरेवार, सचिन शेट्टी अशा असंख्य विद्यार्थ्यांनी आपापल्या क्षेत्रात उत्तुंग भरारी मारल्याचे पाहून क्षणभर मलाच पंख फुटले नाहीत ना असा भास होतो.

काही कुटुंबच भरभरून सुख देतात जसं वैशाली पारसनीस, आशाताई बिंदूमाधव जोशी, विमल लाहोटी, प्रभावती जगताप, अपर्णा जोशी व वृंदावन सोसायटीचे अप्पा शिंदे.

दूरवरील डॉ. मंदा आमटे, राणी बंग, मधुकर उपलेंचवार, शशी थरूर, सुंदरलाल बहुगुणा, अण्णा हजारे, निर्मला सोवनी, मृणालिनी गोरे, ए.के.अँटनी, सुधा मूर्ती, अब्दुल कलाम यांच्या सामाजिक कार्यापुढे मान झुकते तर साता समुद्रापलीकडे जिमी कार्टर, बिल गेटस, बराक ओबामा आदर्शवत वाटतात.

वृंदावन सांस्कृतिक भवनात वेगवेगळ्या क्षेत्रात आपला ठसा उमटविणारी रेवती, समृद्धी, रमा, सई, पियू, ज्ञानदा, मानस, श्रीराम, संकेत, मृणाल, साकेत अशा खूपशा चिमुरड्यांवर जीव ओवाळावासा वाटतो. मनाचे श्लोक मधील 'जगी सर्व सुखी असा कोण आहे' या ब्रीद वाक्याने मन कणखर होतं तर सुनंदा, सविता पालेकर अन् शशिकला पैच्या सान्निध्यात सुखासीन होतं.

नुकताच गौरीगणपतीचा उत्सव साजरा झाला. मन शुद्ध ठेवून पवित्र भावनेनं सुखकर्त्यास प्रार्थना केली की यापुढील आयुष्यही असंच सुखी, समाधानी व संतुष्ट ठेव तुमचं, आपलं व सर्वांचंच!!

शांती, समृद्धी व एकी घेऊन घरी आलेल्या गौराईस हात जोडून विनविलं :

सर्वेति सुखिनः संतु ऽऽऽ

प्रसिद्ध लेखक रणधीर खरे म्हणतात, "The true Indian way of life is one in which human beings and nature merge into a beautiful closeness." बसं,ही माझी सर्वोत्कृष्ट सुखाची कल्पना

**- श्यामला अरविंद पुरंदरे**
२७ ब, वृंदावन सोसायटी,
पंचवटी, पाषाण, पुणे ४११ ०४१
फोन : ०२० - २५८९८५३४
मोबाईल : ९४०३६२५७२४

## सहवेदना

श्री. चिंतामणी उर्फ चिंतामण शंकर मराठे (वय ७८), (पृ.क्र.६२) यांचे १४ सप्टेंबर, २०१० रोजी आकस्मिक निधन झाले.

ते महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातून निवृत्त झाले होते. संगीताची आवड असल्याने अनेक कार्यक्रमातून पेटीची साथ त्यांनी केली होती. तसेच अनेक सामाजिक उपक्रमातही त्यांनचा सक्रिय सहभाग असे. त्यांच्या आत्म्यास परमशांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. श्री. चिंतामणी उर्फ चिंतामण शंकर मराठे यांना विनम्र श्रद्धांजली

प्रेषक : श्रीनिवास चिंतामण मराठे

**गायनाचे रंगी । शक्ती अद्भुत हे अंगी ।।**

# आढे सांभाळणारी तपस्विनी

**कै. विनायक दत्तात्रेय मराठे**

आमचे वडील सहा महिन्याचे असतानाच त्यांची आई कांडर चावून गेली. तेव्हापासून त्यांचा सांभाळ त्यांच्या चुलतीने केला. ती येसूची आजी. येसू आमची चुलत चुलत बहीण. आमचे वरचे घर व त्यांचे खालचे घर. तिचे यजमान व आमचे आजोबा हे सख्खे भाऊ. आमचे आजोबा आमच्या घराण्यात दत्तक आले. अर्थात नातेसंबंध आधीपासूनच चालत आलेले. कोकण म्हणजे अठरा विश्वे दारिद्र्य. व त्यातही ओसाड गावात बोडकी सव्वाशीण तसे आम्ही इनामदार म्हणजे त्यातल्या त्यात खाऊन पिऊन सुखी व खालचे घर म्हणजे जीवनाशी सामना करणारे. तरीही त्या माऊलीने आमच्या वडिलांना तळहातावरच्या फोडासारखे सांभाळले. आम्ही लहानपणी शाळेला सुटी लागली की राजापुराहून घरी विल्याला पळायचे. त्या वेळी आम्हाला फक्त खालच्या घरी येसूची आजी राहते एवढेच कळायचे.

येसूची आजी मोडकळीला आलेल्या घरात एकटीच राहायची. सोबतीला येसू-नात. आम्ही तिला पाहिली ती जख्ख म्हातारी. पांढरे केस, तोंडाचं बोळकं, चेहऱ्यावर सुरकुत्या व रोडावलेली. पण वाणीत गोडवा व वागण्यात प्रेम एवढे भरलेले की त्यात चिंब न्हायला व्हायचे. आम्ही गेलो की पहिला प्रश्न ''दत्तू बरा आहे ना रे बोड्यानो?'' आम्ही आ वासून पाहायचे.

''अरे तुमच्या बापाचे विचारत्ये. मी खाली आणला तेव्हा हा एवढा वितभर होता. चिंधीची चिरोटी करून दूध पाजले. अतां मोठा झाला.'' आम्हाला काहीच बोध व्हायचा नाही. तिचे नातू पणती आल्या की त्यांची मग निराळीच भाषा सुरू व्हायची. ''तात्या, तू वरचे वठारी जाय सस नी? गो मे तेकडे तेकडे जावेचो नाय. तू हवे तर विद्यास पाठव. विद्यास किणलां, तूच मोठेपणी जावेस हवे.'' आम्हाला गंमत वाटायची.

आम्ही सुटीत घरी गेलो की एक दिवस आम्हाला येसूच्या आजीची मेजवानी असायची. वरच्या घरची आमची चुलत भावंडं व आम्ही. ''रे मुलांनो, उद्या दुपारी माझ्याकडे मीठ भाकरी खायला या. माझे आपले गरीबाचे काय असेल ते गोड मानून घ्या.'' आणि नाचणीची भाकरी, लोणी, आणि लोणचे किंवा थालीपीठ लोणी आणि लोणचे असा चविष्ट बेत असायचा. खायला काय असायचे यापेक्षा तिच्या आग्रहातला जिव्हाळा व प्रेम जे असायचे ते जास्त चवदार व रुचकर असायचे. आम्ही तृप्त होऊन ढेकर द्यायचो व तिच्या डोळ्यांतले समाधान आम्हाला त्या लहान वयातही जाणवायचे.

दिवस जात होते. आम्ही वयाने वाढत होतो तसतशी नवी नवी जाणीव वाढत होती. येसूच्या आजीचा ऐन उमेदीतच नवरा गेलेला. सूनही डोळ्यादेखत विधवा झालेली. तिच्या पदरात सात मुले. घराच्या आढ्याची जबाबदारी या दोघींवरच आलेली. सून बाहेर पडून मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी सांभाळत होती व सासू घराचे आढें सांभाळत होती. वर्षाचे केवळ चार महिने पुरणारे शेतीचे उत्पन्न. मोडकळीला आलेले घर, चार झाडेमाडे. म्हातारी हाता तोंडाची गाठ कशी घाली व ताठ मानेने कशी राही हे तिलाच ठाऊक! परमेश्वर झोपलेलाच. त्याला काय ठाऊक असणार! पण तिच्या चेहऱ्यावरचे समाधान काही लोपलेले पाहिले नाही.

सून सांगे, ''माझ्याकडे चल, आपण दोघीही काय असेल त्यात भागवू.'' पण म्हातारीचे एकच पालुपद ''मी आल्ये की हे वाडवडलांपासूनचे घर कसे उभे राहील? आपली पाठी फिरली की आढें खाली आले. मी आपली या आढ्याखालीच राहणार व आढ्याखालीच मरणार.'' आढ्या-खालीच मरणार यावर जास्त जोर! जिवाचा साथीदार अर्ध्यावरच सोडून गेला तरी म्हातारी घराची साथ सोडायला तयार नव्हती.

दिवस जात होते आणि येसूची आजी अधिकच म्हातारी होत चालली होती. एक कळशीभर पाणी पण आणायला जमत नव्हते. नातवंडे आपापल्या मार्गाला लागली होती. दिवसें दिवस येसूच्या आजीच्याने होत नव्हते. आमची आत्या व दादाकाका तिला वरच्या घरी येऊन राहायला सांगायचे. पण तिचं ते खरं! ''गो, या आढ्याखाली मरण येण्यापरते सुख नाय. त्यातून अगदीच होत नायसे झाले नि जाग्यावर पडल्ये तर न्या वर. पण आपणाहून आढे सोडायचे नाही.''

एक दिवस घरांत कोल्हा शिरला. एक दिवस घरात साप फिरत होता. पण आजीला कशाची डर नाही. ''अरे, मी जर त्याचे काय वाईट केले नाही तर तो माझे कशाला काय वाईट करील? तो त्याच्या वाटेन मी माझ्या वाटेन'' निश्चय, स्थितप्रज्ञता, करारीपणा, सहनशीलता व आणखी काही, सर्व काही एक ठिकाणी एकवटलं होतं.

शेवटी शेवटी सकाळ संध्याकाळ वरच्या घरची कोणी ना कोणी खेप टाकून जायची. आजीला पण समजले होते. चाहूल लागली की ती आतून आवाज द्यायची, ''आहे गो मी. ये बस!''

अशीच एक दिवस संध्याकाळी आमची आई भेटायला गेली. आजी पार थकलेली. हालचालही धड होत नव्हती. दुपारचे अन्न तसेच झाकून पडले होते. आमची आई आग्रह करायला लागली,''सासूबाई, आज तुम्हाला आम्ही वरच्या घरी नेतो. मी वर जाऊन डोळी पाठवते.''

''गो नको. आजची रात्र जाऊ दे. उद्या पण असेच राहिले तर तर येईन वर.''

दुसऱ्या दिवशी सकाळी दादा खेप टाकायला गेले, तर घरात सामसूम. आजीचा आवाज नाही. दादांनी दबकतच दार ढकलले तर समोरच येसूची आजी डोक्याशी हात घेऊन कुशीवर झोपलेली. कायमची आढ्याखाली!


**- कै. विनायक दत्तात्रेय मराठे**

मृगधारा, ४०८ यशवंत नगर,
तळेगाव दाभाडे, जि. पुणे
पुणे - ४१० ५०७

# ‘‘अतिथी देवो भव!’’

**सौ. मीना सदानंद मराठे (पृ. ४१७)**

‘आलेला पाहुणा हा देवाप्रमाणे असतो’ खरंच या उक्तीचा प्रत्यय आम्हाला पंजाबमध्ये आला.

५ एप्रिल २००१ मध्ये आम्ही सिमला-कुलूमनालीच्या सहलीला गेलो होतो. मुंबई-पठाणकोठ- सिमला असा प्रवास होता. मुंबई-दिल्ली-पठाणकोट पहाटे ५.३०मि. आम्ही पठाणकोटला पोहोचलो. रम्य पहाट, थंडगार हवा, प्रसन्न वातावरण सर्वत्र हिरवेगार निसर्गसौंदर्य, पठाणकोट येथे नाश्ता करून आमचा मनालीचा प्रवास सुरू झाला.

आहाहा! काय वर्णन करू आणि किती वर्णन करू असे झाले आहे. मंडीमार्गे मनालीपर्यंतचा प्रवास हिमालयातील नागमोडी रस्त्यावरून मिनिबसमधून सुरू झाला. दुतर्फा दिसणारे सूचीपर्णी वृक्ष, दूरवरून डोकावणारी हिमाच्छादित शिखरे, मंडी ते मनाली सोबत करणारी, खळाळत वहाणारी ‘बियास’नदी, खरंच सर्व नयनरम्य होते. आपल्या मातृभूमीच्या अनोख्या निसर्गसौंदर्याचा अनुभव घेत आम्ही मनालीला पोहोचलो.

आपल्या देशाचे रक्षण करणाऱ्या हिमालयाचे इतक्या जवळून दर्शन झाले, तेव्हा मन भरून आले.

दोन दिवस मनालीत मुक्काम करून तिसऱ्या दिवशी सिमल्याला गेलो. कलकीहून सिमल्याकडे येणारी छोटीसी आगीनगाडी सिमला रेल्वे स्थानक, तेथील प्रसिद्ध शाळा, महाविद्यालये, देवळे, चर्चअगदी जवळून पाहता आली. सिमल्यातील राहणीमान खूपच वेगळे आहे. तेथील भाजीबाजार, फळबाजार, मॉलरोड यावरून फेरफटका करताना खूप मजा आली. तेथे राहणारी माणसे कष्टाळू व प्रामाणिक आहेत हे लक्षात आले.

दोन दिवस सिमल्यात राहून परतीचा प्रवास सुरू झाला. पहाटे ४.३०वा. उठून दिल्लीकडे जाण्यास निघालो दिल्लीहून दुपारी ४ वाजता निघणारी ‘राजधानी एक्सप्रेस’ गाठायची होती ना.

सिमल्यातील नागमोडी घाट उतरून आम्ही कर्नालला आलो. आदल्या दिवशी कर्नालला पाऊस पडून गेला होता. सकाळी ९.३०वा आम्ही तेथे पोहोचलो. दिल्ली गाठण्यास अजून ३ तासांचा अवधी होता. सर्व प्रवासी दिल्लीत भोजन आटोपून मुंबईकडे प्रयाण करण्यास उत्सुक झाले होते. बसचालकास सर्व प्रवासी दिल्लीला कधी पोहोचणार? असे विचारत होते. लोकांची उत्सुकता लक्षात घेऊन त्याने जवळच्या मार्गाने बस नेण्याचे ठरविले. त्याने त्याकरिता आमची बस एका शेतातून जाणाऱ्या पायवाटेकडे वळविली. थोडे अंतर गेल्यानंतर चक्क बसची दोन चाके चिखलात रुतली.

आम्ही सर्व प्रवासी घाबरून गेलो. आता काय करणार? दिल्लीला कसे जाणार? राजधानी कशी गाठता येणार? मुंबई तर दूर की बात! अनेक शंका, भीती, चिंता सर्वांच्या चेहऱ्यावर दिसू लागले. बसचालकाच्या बाजूच्या खिडकीतून उड्या मारून आम्ही सर्व प्रवासी खाली उतरलो. पण आता पुढे कसे जायचे? हे प्रश्नचिन्ह सर्वांच्या चेहऱ्यावर होते.

इतक्यात बाजूच्या शेताडीतून काहीतरी हालचाल ऐकू आली. शेतातून ३-४ तगडे पंजाबी शेतकरी पुढे आले. आमची अडचण त्यांच्या लक्षात आली. दूरवर त्यांचे ट्रक उभे होते. त्यांनी ट्रकमधून जाडजूड साखळदंड बाहेर काढले. त्याचे एक टोक ट्रकला बांधले व दुसरे टोक बसला बांधले. दुसऱ्या बाजूने ट्रक सुरू करून पाचमिनिटात रुतलेली बस बाहेर काढली.

आम्ही सर्वांनी उड्या मारून, टाळ्या वाजवून आनंद व्यक्त केला. मदतीसाठी धावून आलेल्या शेतकऱ्यांना धन्यवाद दिले. नमस्कार केला. त्यांच्यातील एका वडिलधाऱ्या व्यक्तीने, ‘‘तुम्ही असे कसे जाणार? चहापाणी, लस्सी घेतलीच पाहिजे’’असा आग्रह धरला. ‘‘यह तो हमारी मेहमाननवाजी है।’’ असे म्हटले. माझे डोळे भरून आले. हे फक्त भारतातच घडू शकते, हे नक्की!

मना घडवी संस्कार - ‘‘अतिथी देवो भव!’’

**- सौ. मीना सदानंद मराठे**
**(पृ.४१७)**

४८६, राधानारायण, वांद्रा, मुंबई ४०००५०

## वाचकांचा पत्रव्यवहार

माझ्या एका जिज्ञासेला हितगुजमध्ये प्रसिद्धी देऊन माझी जिज्ञासा पुरी व्हावी.

माझी जिज्ञासा पुढीलप्रमाणे : आपल्या मराठे कुलाची १. खांबेटे २. चक्रदेव ३.जाईल ४. रटाटे ५. जोशी ६.विद्वांस इत्यादी पोट आडनावे आहेत. ही पोट आडनावे केव्हा निर्माण झाली असावीत? का निर्माण झाली असावीत? तसेच आपले मराठे हे आडनावचाही इतिहास कोणी जाणकार कुलबांधव देईल का? कदाचित ज्यांनी कुलवृत्तांत निर्माण करण्यात बहुत परिश्रम घेतले ते सांगू शकतील. माझ्या जिज्ञासेमुळे आपल्या कुलातील तरुण-तरुणींनाही इतिहास ज्ञात होईल.

- चिंतामण महादेव मराठे (पृ. २२२), १०६/४ खटाव बिल्डिंग, डॉ.एस.एस.राव मार्ग, लालबाग,
मुंबई ४०००१२. दूरध्वनी : ०२२-२४१५५३९०

(कृपया जाणकार कुलबांधवांनी त्यासंबंधी आपली मते ‘हितगुज’कडे पाठवावीत म्हणजे चिंतामणरावांची ‘जिज्ञासा’ पुरी होऊ शकेल. मराठे कुलवृत्तांतात याविषयीची माहिती मिळू शकेल.)

## सहवेदना



आपले कुलबांधव श्री. सुरेश भिकाजी मराठे यांच्या ज्येष्ठ भगिनी कै. सौ. सरोजिनी कृष्णाजी देवल, पूर्वाश्रमीच्या मराठ्यांची माहेरवाशीण विमल भिकाजी मराठे यांचे गुरुवार दिनांक १६-९-२०१०ला दु:खद निधन झाले.

कै. सौ. सरोजिनी या सुरुवातीपासून मराठे प्रतिष्ठानच्या (पुणे) सक्रिय सभासद होत्या. त्यांचा शुभविवाह दिनांक ६-४-१९६६ ला कृष्णाजी देवल यांच्याबरोबर झाला. पुष्कराज बंगला, ओमकार सोसायटी, कात्रज, पुणे येथे त्यांचे वास्तव्य होते. विवाहानंतर प्रापंचिक जबाबदारी सांभाळून सेवासदन, पुणे येथे दोन वर्षांचे शिक्षक ट्रेनिंग यशस्वी केले. त्यानंतर शिक्षिकेची नोकरी सुरू केली. सन १९६० मध्ये एस.एस.सी परीक्षा पास होऊन त्या पुणे कार्पोरेशनमधून हेडमास्तर म्हणून दिनांक ३०-१०-१९९२ला सेवानिवृत्त झाल्या.

त्यांच्या पश्चात पती, मुलगे, सुना, नातवंडे आहेत. ही सर्व माहिती भाऊ या नात्याने त्यांचे बंधू श्री. सुरेश भिकाजी मराठे,दहीसर यांनी कळवली आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. सरोजिनी कृष्णाजी देवल (मराठे) यांना हार्दिक श्रद्धांजली. मराठे प्रतिष्ठान कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे. ईश्वर मृतात्म्याला सद्‌गती देवो ही प्रार्थना

## सहवेदना



दररोज गणपतीवर २१ आवर्तनं केल्याशिवाय वास्तू न सोडणारे (माझे पती) सदाशिव गोविंद मराठे, घाटकोपर (पृ. ४२७) हे गणेश चतुर्थीच्यादिवशी ११ सप्टेंबर २०१० रोजी ७९व्या वर्षी गणपतीचरणी लीन झाले.

अन्ननलिकेच्या कॅन्सरने ते गेले सात-आठ महिने तब्येतीशी झुंज देत होते. टाटामध्ये ऑपरेशन उत्तम झाले होते. प्रयत्नांची पराकाष्ठा केली, पण यश आले नाही. पोटातले दुखणे असह्य झाल्याने त्यांनी १५दिवसांनी जेवण सोडले व पातळ पेयावर राहू लागले. पहिल्यापासून काटक व उद्योगी मनुष्य हळूहळू अशक्त होऊ लागला. व मनात नकारार्थी विचार येऊ लागले. शेवटपर्यंत स्मरणशक्ती तीव्र होती. सोसायटीला सदैव वाहून घेतलेली असामी होती.

१ सप्टेंबराला ह्यांना मानपत्र, ५००१चा गौरवनिधी,शाल व श्रीफल देऊन गौरव केला.

गरीबी कायमचीच होती. एकेक भाच्याला मामा मुंबईत घेऊन आले. गिरगावातील लहान जागा, पण मामाचे मन मोठे होते. जे पडेल ते काम करून, शिकवण्या करून, फी भरून ते जुनी ११वी मॅट्रिक झाले. कोणतीही सुविधा नसताना त्यांना त्या वेळी गणितात ७५% मार्क होते.

परोपकारी, अबोल असा मनुष्य पुन: होणे नाही. ११मार्चला लग्नाचा सुवर्णमहोत्सव घरातल्या घरात पार पाडला.

त्यांच्या पश्चात दोन मुली व एक मुलगा आहे. माझा नातू हर्षद प्रसाद आठवले (५०,०००तून ४८वा) सी.ए. झालेला विमानाने ऑडिटिंगला जाऊ लागला, परदेशात पण जाऊन आला. पण आल्यानंतर आजोबांना नमस्कार करायला आजोबा नव्हते हे आमचे दुर्दैव

साश्रूनयनांनी वाहिलेली ही श्रद्धांजली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो.

मराठे प्रतिष्ठानद्वारा भावपूर्ण श्रद्धांजली

-श्रीमती वत्सला सदाशिव मराठे, सौ. संजीवनी, सौ. माधुरी व अनंत मराठे.

## सहवेदना



सौ. प्रमिला लक्ष्मण मराठे (पृ.२८०) यांचे वयाच्या ८२व्या वर्षी दिनांक २४ सप्टेंबर २०१० रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांनी श्री. चंद्रशेखर विद्यालय (श्रीपूर) येथे २३ वर्षे अध्यापन केले व वा.शि.वैद्य (मुलींची) प्रा. शाळा, पुणे येथे ६ वर्षे मुख्याध्यापिका होत्या. कित्येक वर्षे स्कॉलरशिपच्या मुला-मुलींना विशेषत्वाने मोफत मार्गदर्शन यशस्वीपणे केले. त्यांचे अनेक विद्यार्थी आज उच्चपदे भूषवित आहेत. विशेष म्हणजे अहेवपणी त्यांना मरण आले.

सौ. नीलांबरी रमेश मराठे यांच्या त्या चुलत सासूबाई आहेत. मराठे प्रतिष्ठानद्वारा कै.सौ.प्रमिला लक्ष्मण मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

# प्रेमळ, समजूतदार सासूबाईंचे पत्र

**सौ. वत्सला स. मराठे (पृ. ४२७)**

*नवागत लक्ष्मीच्या पावलाने येणाऱ्या सूनबाईस,*

*सौ. सासूबाईंचे लक्ष लक्ष आशीर्वाद. मला सून हवी होती नीटस, कमीत कमी पदवीधर, सुसंस्कारीत घराणे असलेली, एकत्र कुटुंबात आवडीने राहू इच्छिणारी, आणि अशा या माझ्या अटीत तू बसल्याने व तुझ्या अहोनी आगे बढो म्हणताच आम्ही आमच्या परी तुझी चौकशी केली व साक्षगंधाविधी अक्षय्यतृतीयेला करायचं ठरवलं. वास्तविक हा साडेतीन मुहूर्ततला एक दिवस पण मनोमन म्हणाल तर मी मात्र उदास होते. कारण माझे वडिलांनी याच दिवशी जगातून प्रस्थान केले होते. पण दुसरं मन म्हणे ते नक्कीच नातवाला व नातसुनेला आशीर्वाद देतील.*

*विवाहतिथी जसजशी जवळ येत तसतशी नातेवाईकांची काय तारांबळ उडते म्हणून सांगू? विवाह मनाजोगता पार पाडणं हेसुद्धा एक टीमवर्कच असते. त्यामागे सर्वांची मेहनत असते. दोन्ही पक्षात कामं चालू असतात खरी पण तितकीच दोन्ही उत्सवमूर्तीची थट्टामस्करीही चालू असते. तूही वरवर हसून त्याला साथ देत असशील. पण मनातून मात्र अस्वस्थ असशील. मनात नाना विचारांचे मळभ येत असेल. दोन्ही वन्स कशा असतील? मामंजी सेवानिवृत्त झाले आहेत त्यांचा स्वभाव कसा असेल? ह्यांच्या आई मला समजून घेतील ना? आणि मुख्य म्हणजे दारी आलेला पाहुणा मला मनापासून आपलं मानेल ना?*

*आणि तुझी आई मध्येच झोपेतून जागी झाली की तिचे विचार चालू होतील माझी लाडली तिथे सुखी होईल ना? दादा म्हणतील हातात हात देताना एकुलता एक, द्विपदवीधर निरोगी हसतमुख जावई शोधला आहे. पाहू या कसे काय नंदूला सांभाळतो ते? तुझा भाऊ म्हणेल, ''आता ताईचा सहवास हळूहळू कमी होणार'' पण मी या सर्व प्रश्नांना एकच उत्तर देईन व ते म्हणजे ही ''श्रींची इच्छा''*

*मधल्या मिळालेल्या अवधीत तुला आम्हा तिघांचा स्वभाव कळला असेलच. सर्वगुणसंपन्न देव पण नाहीत मग आपण तर यकश्चित मानव. मी तर म्हणेन, अर्धा पेला भरला असला तर तेवढंच आपलं सुख समजून आलेले दिवस साजिरे गोजिरे का करू नयेत? एकमेकांची मने निर्मळ हवीत. एकमेकांवर गाढ विश्वास हवा. थोरामोठ्यांच्या पुढे नमस्काराला तू लाजत नाहीत पण अशा कितीतरी मुली माझ्या पाहण्यात आहेत की मी पदवीधर मी का वाकावे? नटसम्राट नाटकात गणपतराव बेलवलकर म्हणतातत नमस्कार करण्याजोगी माणसे असून नमस्कार न करण्याची बुद्धी होणे म्हणजे स्वभावाचा तो करंटेपणाच म्हणायला हवा. आता साधं उदाहरण बघ हं पावसात मोठ मोठे वृक्ष वाकतात, पण लव्हाळे मात्र ताठ राहते का तर ते मुळात नम्र आहे.*

*तुझ्याजवळ जर समजूतदारपणा असेल तर तुझ्या दोन्ही वन्स तुझ्या मैत्रिणी होतील एक लक्षात ठेवायचं की आपण या घरात नवीन आहोत तेव्हा बोलणं कमी आणि निरीक्षण जास्त. सर्वांना समजून घेताना आपल्या सख्याच्या मनाला जपायचं आहे बरं का? निरोगी हसतमुख अशा वातावरणात घरही आनंदाने डोलू लागते. कामाच्याबाबतीत तुझं सहकार्य असेल ना?*

*तरुण मनांची भूक समजून घेत असताना कधी रागवून कधी लाडिकपणाने तर कधी सामोपचाराने त्याला समजून घ्यायचं आहेस. आमचं घर स्वावलंबन की जय ह्या तत्त्वावर चालणारे आहे. सर्व कामे घरातच आहेत. आम्ही एकमेकांना समजून घेतो. कारण प्रत्येकाचं म्हणणं असं की घरातल्या कामाला लाजायचं का?*

*मी तीन भजनी मंडळात जाते तेवढंच बाहेरच्या समाजात मिसळायला मिळते. काम करताना चुकलं तर न रागवता 'घेते हे मी सांभाळून' असं म्हटलंस की समोरच्याचा निम्मा राग कमी होतो बघ!*

*जरा मोठंच झालं ना पत्र!*

सौ. सासूबाई

**- श्रीमती वत्सला स. मराठे (पृ. ४२७)**

C/o स. गो. मराठे बी/५/२७, बेस्ट राजहंस, घाटकोपर (पू.) ४०००७५

## वाचकांचा पत्रव्यवहार

हितगुजचा सप्टेंबर २०१०चा ८३वा अंक नुकताच मिळाला. अंक प्रसिद्ध झाला अगर नाही ते मी वेबसाईटवर बघत होतो. एकदा आपणास फोन केला होता पण आपण घरी नव्हता.

उशीरा का होईना प्रसिद्ध झालेला अंक छानच आहे. 'जपान आमचा व्याही', सावरकरांवरील पुस्तकपरिचय, ९९क्लब इ. सर्वच मजकूर वाचनीय आहे. त्याबद्दल आपले अभिनंदन! असे अंक निघत राहिले तर मासिक काढावे लागेल.

संपादकीय थोडक्यात असावे व त्याप्रमाणे ते आहे ते स्वागतार्ह आहे.

**- श्री. वि. म. मराठे**

## ।। श्री व्याडेश्वराची आरती ।।

*जयदेव जयदेव जय व्याडेश्वरा, कृपाछत्र राहो आम्हा पामरा ।।धृ।।*

*जगदारंभी तू सुप्त होतासी । सदिच्छेने तव सृष्टी निर्मिसी ।।*
*सजीवा निर्जिवां भूतां वावरसी । सर्वांमध्ये राहूनी का गुप्त रहासी ।।१।।*

*सर्व भूतोत्तम निर्मिला नर । विशेषरूपे तू केला सादर ।।*
*मायारूपे त्यांना देसी परिवार । त्यामाजी सुख देऊनी करा उद्धार ।।२।।*

*कोकणसागर भूमी निर्माणकाले । विप्रे परशूरामे तुजलाऽद्ये नमिले ।।*
*गुहग्रामी शिवतत्व स्वयमावतरले । व्याडेश्वर शिवनामे प्रसिद्ध झाले ।।३।।*

*शिवशक्ती योगेश्वरीसह मी तुज भजतो । पूजन करूनी नित्याऽनंदित मी होतो ।।*
*प्रपंच सुखमय करण्या तुजला मी ध्यातो । तवपदी श्रीनिवास नतमस्तक होतो ।।४।।*

**रचयिता : श्री. श्रीनिवास कृ. मराठे,**
हंसापूर, पोस्ट : कासारवर्णे तालुका : पेडणे, गोवा - ४०३ ५१२ फोन : ०८३२-२२०५१४४

## मराठ्यांच्या माहेरवाशिणींचे यश

जयंत रघुनाथ मराठे, पर्वती, पुणे ९ यांच्या कन्या सौ. ज्योती मिलिंद आपटे सध्या पठाणकोट येथे वास्तव्य व सौ. विजयश्री अतुल अभ्यंकर, पाषाण-सूस रोड, पुणे या दोघीही मे २०१० मधील Post Graduate Diploma in Psychological Counselling- recognised by The Indian Hospital Association & Open International University प्रथम वर्गात उत्तीर्ण झाल्या. मराठे प्रतिष्ठानद्वारा सौ. ज्योती व सौ. विजयश्री या दोघी बहिणींचे हार्दिक अभिनंदन!

## मानसन्मान



**श्री. संकेत काशिनाथ केळकर** दिनांक १९-८-२०१०ला चार्टर्ड अकौटंट परीक्षा उत्तीर्ण झाले. २००२ साली ते बीकॉम झाले त्यानंतर पुणे येथे पुढील शिक्षणासाठी त्यांचे काका श्री. विनायक विष्णू केळकर यांच्याकडे गेले. श्री. संकेत मूळचे मु.पो.फणशे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग येथे राहणारे आहेत. त्यांच्या मातोश्री सौ. अर्चना काशिनाथ केळकर या मराठ्यांच्या माहेरवाशिण आहेत. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव लीला दत्तात्रेय मराठे आहे. त्यांचे पती काशिनाथ विष्णू केळकर देवगड येथे किराणामालाच्या व्यापारात आहेत. त्यांचा व्यवसाय त्यांच्या वडिलांनी देवगड येथे १९३७ साली त्यांचे नातेवाईक नेने यांच्यासोबतीने भागीदारीत सुरू केला तो अजून चालू आहे.

अशा या कौटुंबिक पार्श्वभूमीवर श्री. संकेत सीए झाले याचे विशेष कौतुक आहे. सध्या ते ''कीर्तनेपंडित'' यांच्या फर्ममध्ये पुण्याला नोकरीत आहेत. याच फर्ममध्ये त्यांनी आर्टिकलशिप पूर्ण केली. पुढे कंपनी सेक्रेटरी (सीएस) करण्याची त्यांची इच्छा आहे.

सीए श्री. संकेत काशिनाथ केळकर यांचे मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक अभिनंदन!

## मानसन्मान



**चि. श्रेयस शरदचंद्र मराठे** (पृ.३७०) हा बीई. (मेकॅनिकल) परीक्षेत पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाला. त्याला ६९% मार्क मिळाले. चि. श्रेयस हा शं. दा. मराठे, ठाणे यांचा नातू आहे. चि. श्रेयसचे मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक अभिनंदन!

## मानसन्मान

श्री. ग. भा. मराठे (पृ.४२७) यांचा नातू, अशोक व मानसी मराठे यांचा द्वितीय पुत्र (बेस्ट कॉलनी, घाटकोपर येथील रहिवासी) **चि. अनिकेत अशोक मराठे** हा यंदा बीई इलेक्ट्रिक परीक्षेत फर्स्टक्लास विथ डिस्टिंक्शन (८०%) मार्कस मिळवून उत्तीर्ण झाला. सिमेन्स या कंपनीत त्याची नेमणूक झाली आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा चि. अनिकेत याचे हार्दिक अभिनंदन!

## मानसन्मान

श्री. गजानन मराठे, पुणे (पृ.१२९) यांचा पुतण्या व श्री. सतीश मराठे, मुंबई, (पृ.१२९) यांचा मुलगा चि. पुष्कर सतीश मराठे मुंबई विद्यापीठातून इंजिनियरींग शाखेची पदवी डिस्टिंशनमध्ये प्राप्त केली असून तो लवकरच आपल्या उच्च शिक्षणाकरता जर्मनी येथे जाणार आहे. त्याला आमच्या संपूर्ण मराठे परिवाराकडून शुभेच्छा व आशीर्वाद!

मराठे प्रतिष्ठानद्वारा चि. पुष्कर याचे हार्दिक अभिनंदन!

## मानसन्मान

चि. मंदार मकरंद अलाटे (श्री. बाळकृष्ण काशिनाथ चक्रदेव, चिंचवड यांचा नातू) याला मार्च २०१० मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत ९१.०९% गुण मिळाले आहेत.

मराठे प्रतिष्ठानद्वारा चि. मंदारच्या या घवघवीत यशाबद्दल हार्दिक अभिनंदन! पुढील शैक्षणिक वाटचालीत असेच भरघोस यश मिळो या शुभेच्छा!

# श्रद्धा की योगायोग! श्रद्धाच!

**सदाशिव बळवंत मराठे (पृ. ३८०)**

जवळजवळ ३० वर्षांपूर्वीचा हा प्रसंग आहे. माझे एक स्नेही नेहमीप्रमाणेच काही पुस्तके घेऊन मजकडे आले. खुर्चीत बसल्यावर त्यांनी माझ्यापुढे एक पुस्तक ठेवून हे 'तुम्हा दोघांकरिता आणले आहे.' असे म्हणून माझ्या हातात दिले. मी उघडून पाहिले तर ते साधे पुस्तक नसून प.पू.सद्‌गुरू श्री गजानन महाराज ह्यांची पोथी होती. मी आदराने नमन करून ती पोथी उघडली व सौ. वतीस दाखवली. तिलाही आपल्य घरी सहजगत्या चालून आलेली पोथी पाहून आनंद झाला. थोडा वेळ गप्पा-टप्पा झाल्यावर माझे स्नेही निघून गेले. दुपारनंतर ती पोथी प्रथमच पाहत असल्याने उत्सुकेपोटी काही वाचन केले. का कुणास ठाऊक माझ्या मनाने पोथीचे पारायण करण्याचे ठरवले. सौ. वतीसही ते रूचले. दोघांनी एक-एक पारायण केले आणि साहजिकच शेगावला महाराजांचे दर्शन घेण्याची प्रेरणा मिळाली.

थोड्याच दिवसात शेगावला जाण्याचे ठरविले. तपास करून अहमदाबाद-शेगाव बस बडोदा (वरोडरा)मार्गे जाते असे समजले. लगेचच आम्ही त्या बसने जाण्याचे ठरविले. महाराजांचे पुढे प्रसादाकरिता बडोद्याच्या प्रसिद्ध दुकानातून पेढे घेतले. एस.टी स्टँडवर वेळेवर पोहोचलो. तिथे पोहोचल्यावर समजले की आज ती बस रद्द झाली आहे. विचार आला की असे का व्हावे? आपली श्रद्धा कुठे कमी पडली का? दुसरे दिवशी रेल्वे स्टेशनवर जाऊन हावडा एक्स्प्रेसचे दुसऱ्या दिवसाचे आरक्षण केले. सौ. वतीने २१ मोदकांचा प्रसाद करून घेतला. गाडीत बसल्यावर आम्हा उभयतांच्या मनात एकाच वेळी विचार आला की, महाराजांना आपले पेढे मंजूर नव्हते म्हणून त्यांनी मोदक घेऊन येण्याकरिता आपला बसचा प्रवास रद्द केला. आणि श्रद्धेपोटी खरोखरच तसे असावे असे ठाम मत झाले. शेगावला पोहोचल्यावर प.पू.महाराजांपुढे तसे निवेदन करून प्रसाद ठेवला आणि मन:शांती मिळाली.

पुन्हा तीन-चार वर्षांनी महाराजांच्या आज्ञेने शेगावला दर्शनास गेलो. सौ. वतीने २१ मोदकांचा प्रसाद करून घेतलाच होता. शेगावला अपरात्री पोहोचलो. त्यामुळे सामूहिक सभागृहात आराम करून सकाळी लवकरच धर्मशाळेत खोली ठेवण्याकरिता कार्यालयात गेलो; परंतु आम्हास खोली देण्यास नकार मिळाला. तपास करता समजले की एका जोडप्यास खोली मिळत नाही कारण काही दिवसांपूर्वी धर्मशाळेच्या खोलीत एका तरुण जोडप्याच्या (?) अनिच्छनीय वर्तनामुळे तेथील ट्रस्टींनी तसा निर्णय घेतला होता. त्यांचा नकार ऐकून मी व सौ. वती परत फिरून बाहेर खाजगी हॉटेलमध्ये जागा मिळते का म्हणून नाराजीने बडबडतच संस्थानाच्या आवाराबाहेर जात असताना समोरून एक उंचीपुरी व्यक्ती स्वच्छ पायजमा व लांब झब्बा घातलेली समोर आली. त्या व्यक्तीने का कुणास ठाऊक आमची विचारपूस केली, तेव्हा आम्ही त्यास आमची अडचण सांगितली तेव्हा तो गृहस्थ म्हणाला, ''चला माझ्याबरोबर, मी पाहतो काही व्यवस्था होते का?'' आमचे बरोबर कार्यालयात येऊन त्याने क्लार्कला काय सांगितले कुणास ठाऊक; परंतु त्याने आम्हाला तिसऱ्या मजल्या-वरच्या खोलीच्या किल्ल्या दिल्या. आमचे नाव नोंदवले. अशारितीने आम्हास संस्थानच्या आवारात जागा मिळाली. ''गजाननाच्या अद्‌भुत लीला, अनुभव येती आजमितीला'' ह्या गजानन बावनीच्या श्लोकाचे स्मरण झाले. इकडे जागा मिळवून दिल्याबद्दल त्या व्यक्तीचे आभार मानावे म्हणून मी किल्ल्या घेऊन मागे वळून पाहिले, आवारात आजूबाजूला पाहिले पण ती व्यक्ती दृष्टीस पडली नाही. मागच्या वेळी मोदकाशिवाय निघालो म्हणून आणि आज जागा मिळावी म्हणून महाराजांनी तर आपणास मार्गदर्शन केले नसेल ना? ह्या विचाराने जागेवर उभे राहूनच त्यांना नमन केले. पुन: पुन्हा त्यांच्या पोथीतील प्रसंग आठवून पाहिले. वाटले, आपल्या श्रद्धेनेच महाराज आपल्या पाठीशी उभे राहिले. धन्य तो महात्मा धन्य तो गजानन अवतार! त्याचे चरणी साष्टांग दंडवत!

त्यानंतर आजतागायत प्रत्येक अडचणीचे वेळी महाराजांनीच आमच्या संसाराला सुखदायी वाटचाल दाखवली आहे.

**सदाशिव बळवंत मराठे (पृ.३८०)**
'अन्नपूर्णा', मराठे वाडा, शास्त्रीलेन,
कोठी चार रस्ता, बडोदे (वडोदरा) ३९० ००९
फोन : २४२३०५५ / २४२८६१८

## नांदा सौख्यभरे

मराठे प्रतिष्ठानचे बंगलोर येथील धडाडीचे कार्यकर्ते श्री. रत्नाकर व सौ. गीता मराठे ह्यांचे ज्येष्ठ पुत्र श्री. रवी ह्यांचा शुभविवाह डोंबिवलीचे श्री. पंडित ह्यांची पुतणी सौ. कां. नेहा हिच्याशी दिनांक ८ एप्रिल २०१० रोजी सकाळी डोंबिवली (प.) मधील त्रिमूर्ती सोसायटीच्या मंगल कार्यालयात थाटामाटात पार पडला. वधूवरांना श्री. सी. गो. खांबेटे व श्री. मो. स. मराठे ह्यांनी मराठे परिवारातर्फे आशीर्वाद दिले.

मराठे प्रतिष्ठानद्वारा नवविवाहितांना हार्दिक शुभेच्छा!

# वाचकांचा पत्रव्यवहार

'हितगुज' सप्टेंबर २०१० चा अंक मिळाला. अंकवाचन रसिक वाचकाला बहुश्रुत करणारे आहे. मला भावलेल्या काही उल्लेखनीय लेखनाचा उल्लेख करणे अगत्याचे वाटते.

* 'गोष्ट एका सोनेरी कुटुंबाची' शमा पालकरांच्या लेखातून पितापुत्राचे नात्यातील अनोख्या वृत्तीचे दर्शन घडते. पदवीधर असूनही कारागिरांच्या हाताखाली कारागिरी शिकूनच, हात प्रशिक्षित करून मगच काउंटरवर येण्याची वडिलांची इच्छा चि. मंदारने मान्य करून सचोटीचे उदाहरण आपल्या आचरणारने युवापिढीपुढे ठेवणाऱ्या पितापुत्रांचे मन:पूर्वक कौतुक. शिक्षण व जीवनशिक्षणाचा सुवर्णमध्य साधणाऱ्या सोनेरी कुटुंबाच्या पुढील वाटचालीला सलाम. (शुभेच्छा)

* सुहासिनी मराठे यांची जीवनाला अर्थ हवा कविता खूप भावली. प्रतिभेला प्रतिभा हवी या ओळी मनाला भिडणाऱ्या व अखेर अंतिमसत्याचा ध्यास, परमेश्वरी समरस होणे, गीत त्याचे गात जाणे. अगदी बरोबर,उदात्त, उत्तम चपखल शब्दयोजना. अभिनंदन

* वि. म. मराठे यांची चिठ्ठी, पाकीट, हँडबॅग, सुटकेस, खोकी या लाचेच्या प्रवासाची कविता सद्यस्थितीच्या वरपांगी खोटेपणाचे विदीर्ण दृश्य रंगविते, तर

* 'उगवत्या ताऱ्यातील' आदित्य व मीरा (आई) सोदाहारण. प्राप्तकाल हा विशाल, भुधर, सुंदर लेणी तयात खोदा हा संदेश आशेचा किरण निर्माण करतो. सुमेधा ताईंच्या कथेला सत्याचा स्पर्श जाणवतो. अभिनंदन

* अश्विनीकुमार मराठे यांचा जपान आमचा व्याही लेख खूप नवीन माहितीचा खजिना सापडल्याचा आनंद देतो. रीतिरिवाज, आहार, धार्मिक आचार, निसर्ग, हवामान अशी विविधांगी माहिती मिळाली. जपानी लोकांच्या दैनंदिन जीवनातील आचरण विशेषत: रेल्वेगाडीत धुम्रपान बंदी पाळणे, फुक्सेचा विशेष उल्लेख, आपणास कौतुकास्पद व अनुकरणीय वाटतो. अभिनंदन.

* निखिल शंतनू मराठे आपल्या कुलबांधवामधील तेजस्वी तारा फिनलँडमधील जागतिक परिषदेत गुगलमधील स्वत:चा प्रोजेक्ट सादर करतोय. कौतुकास्पद. भारतातून निवडलेल्या पाचात एक निखिल अखिल जगतात यशस्वी ठरेल हे निश्चितच. त्याला कुलबांधव-भगिनींच्या शुभाशिर्वादासह शुभेच्छा

* मराठ्यांचा झेंडा दिल्ली दरबारात मानाने फडकविणाऱ्या व महाराष्ट्राचे नाव आपल्या अजोड, सातत्यपूर्ण सेवेने शौर्याने रोशन करणाऱ्या राष्ट्रपती पदकप्राप्त श्री. विलास मराठे यांचा कार्यकर्तृत्वाचा आलेख अंकात आदरपूर्वक वाचावयास मिळाला अशा आमच्या बंधुमुळे खरोखरच देशप्रेम व राष्ट्रनिष्ठा आपल्या दैनंदिन कार्यकालातून साधण्याचे उत्तम उदाहरण आहे. त्यांची पत्नी सौ. अलका व चि. नितीन यांचे विशेष आभार.एसीपीच्या आयुष्यात गृहस्थ जीवन दुर्मीळ होते.

- कुमुद डोके, ए/२१०५/२१०६,
'गिरिजा' नीळकंठ हाईटस, पोखरण रोड नं.१,
ठाणे (प.) - ४०० ६०६ दूरध्वनी : ०२२-२५८८१६५५

## चित्रकार कुमुद डोके यांना Rotary Club of Thane Uptown यांच्यातर्फे मिळालेले मानपत्र

Confers thsi award and recognition to Kumud Doke for the excellence in the field of Painting

Your name has been sepcially selected by our club considering your effort, itegrity, dedication and service above self. These virtues which you have shown in your vacation have benefited many. We are sure that this recognition of your work will inspire others to excel in their vocation and also benefit the community at large.

We extend our best wishes for continuing your work towards the society.

Given on 10.10.2010 at the hands of

Dist. Governor Dr . Jayant Kulkarni (Dist.3140)

Gayatri Naik

Presidend 2010-11

चित्रकार कुमुद डोके यांची 'हितगुज'ची आस्वादक आणि अर्थपूर्ण समीक्षा मनाला भावली. रोटरी क्लबने कुमुदताईंचा सन्मान केला याचा मराठे परिवाराला अभिमान आहे. कुमुदताईंचे मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक अभिनंदन!

# दीपावलीचा फराळ

**श्री. ग. भा. मराठे (पृ.४२७)**

आपले ज्येष्ठ आणि 'बेस्ट' कुलबांधव श्री. ग. भा. मराठे यांनी गेली सोळा वर्ष 'दीपावलीचा साहित्यिक फराळ' पाठविण्याचा प्रघात चालू ठेवला आहे. ऐंशी वर्षांच्या वाटचालीनंतर 'बचेगें तो और लिखेंगे' असे म्हणत हा उपक्रम चालू ठेवण्याची इच्छा आहे. त्यांनी आपणा सर्व मराठे परिवाराला दिवाळीच्या फराळाबरोबरच शुभेच्छाही दिल्या आहेत.

सोपानदेव चौधरी हे कवियत्री बहिणाबाईंचे सुपुत्र ते ''पु.ल.'' सारखे ''कोट्याधीश'' होते. त्यांच्या काही आठवणी वाचनात आल्या.

लहान सोपान्या खेळून घरी आल्यावर माय बहिणाबाई म्हणाल्या, ''थांब पाणी देते.'' सोपान्या म्हणाला, ''मी पानचट नाही.'' आईने चहा किंवा दूध घेण्याचा आग्रह केला तर त्याने उत्तर दिले मी चहाटळा किंवा दुधखुळा नाही. एकदा रिक्षाने जात असता, जोरात रिक्षा चालविणाऱ्या ड्रायव्हरला म्हणाले, ''अरे अंतरिक्षात नेऊ नकोस. जरा हळू चालव.'' अशा काही आठवणी.

नको ती माणसं भेटतात तेव्हा

गोष्ट तीस वर्षांपूर्वीची आहे. आम्ही उभयता युरोप सहलीला गेलो होतो. त्या वेळी केसरी, राजाराणी आदि मराठी संस्था परदेशी सहली आयोजित करत नसत. आम्ही ट्रॅव्हल कॉर्पोरेशनतर्फे गेलो. चाळीस लोकांमध्ये आम्ही चार महाराष्ट्रीयन जोडपी होतो. त्यात एक आगळी वेगळी जोडीही होती. पुरुष वयस्क होता तर महिला तिशीची होती. ते गृहस्थ एका मोठ्या कंपनीचे डायरेक्टर होते. जर महिला पी.ए. असावी, तर त्यांचे वागणे, राहणे पतीपत्नीसारखे होते. पण ते आमच्या मराठी ग्रुपपासून लांब राहत असत. आमच्या ग्रुपमधल्या एका बाईनी त्या तरुण महिलेला प्रथम भेटीतच ''तू लहानपणी पुण्याच्या सदाशिवपेठेतल्या साठ्यांच्या वाड्यातील गोखल्यांची नमू ना?'' अशी विचारणा केली. व आता कोठे असतेस वगैरे तपशील विचारला. ते दोघेही जरा चमकले व उत्तर देण्यास टाळाटाळ केली व आमच्यामध्ये न मिसळता ट्रीपमध्ये वेगळेच वावरले.

रात्री आम्ही काही पुरुष मंडळी 'बार' मध्ये गेलो असता ते गृहस्थ विमनस्क स्थितीत बसलेले दिसले. ते म्हणाले, ''मी माझ्या मैत्रिणीला घेऊन मुद्दाम हजारो रुपये खर्च करून युरोपला आले ते कोणी आम्हाला ओळखीचे भेटावयास नको म्हणून, तर इथेही तिला ओळखणारी व्यक्ती निघाली. आता हिंदुस्थानाता जाऊन ही गोष्ट चविष्टपणे सगळीकडे सांगणार.'' (त्यावेळी हल्लीसारखी अमेरिका, ऑस्ट्रेलिया, इंग्लंडकडे भारतीयांची रीघ नव्हती. युरोपात तर नव्हतीच. आता आैपल्या परिसरातील राहणाऱ्या माणसाशीसुद्धा अमेरिकेत, ऑस्ट्रेलियात भेटल्यावर पहिल्यांदा बोलतो अशी स्थिती आहे. घरटी एकजण परदेशात आहे. मुंबई-पुणे सारख्या ट्रीप्स घरोघरी भारत-अमेरिका दरम्यान होत आहेत.)

मी त्यांचे सांत्वन केले व म्हणालो, ''साहेब आात झाले ते झाले सर्व विसरून आपण मजा करू या. व सहलीचा आनंद लुटू या'' व आणखीन दोन 'पेग' त्यांना दिले.

तो काळ तीस वर्षांपूर्वीचा होता. आता महिला आर्थिकदृष्ट्या सुशिक्षित व सक्षम आहेत. त्यांना समाजाची भीडभाड बाळगण्याचे कारण नाही. 'लिव्ह इन रिलेशनशिपची' तयारी आहे. लग्न झाल्यावर न पटल्यास घटस्फोटाचा पर्याय खुला आहे.

या प्रसंगातून 'नको ती माणसे नेमकी कशी भेटतात' याचा एखाद्याला कसा त्रास होतो याचा अनुभव आला.

काही वेळा कितीही काळजी घेतली तरी मशिनरी दगा देते. बँकेत तर हल्ली कोणतीही चूक झाली तर कॉम्प्युटरकडे बोट दाखवितात. अंदर की बात त्यांनाच माहीत.

बेस्टमध्ये त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांच्या साक्षीने दोन प्रसंग झडले. श्री. वसंतदादा पाटील यांनी दिंडोशी डेपोचे उद्घाटन केले. त्या वेळी अशी व्यवस्था केली होती की स्टेजवर रिमोट कंट्रोलचे बटन दाबल्यावर पन्नास फुटांवर असलेल्या शेडमधील बसचे इंजिन सुरू होईल व ती डेपोतून बाहेर काढण्यात येईल. त्याप्रमाणे चार दिवस चाचणी चालू होती. पण प्रत्यक्षात वसंतदादांनी कित्येक वेळा बटन दाबले तरी इंजिन चालू होईना. दादा गमतीत म्हणाले की, ''मंत्रालयात आम्ही घोषणा करतो पण त्याचा फायदा लोकांपर्यंत मानवी व यंत्रणेतीला त्रुटीमुळे अल्पप्रमाणात पोहोचतो.''

बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री असताना, त्यांच्या कन्येचे मुख्यमंत्र्यांच्या मलबारहिलवरील बंगल्यात लग्न होते. नशिबाने रिसेप्शन मात्र चार तासांनी फोर्टमध्ये होते. मंत्रालयातून बेस्टला विद्युत पुरवठासंबंधी काळजी घ्यावी असे कळविण्यात आले होत. एक ऑफिसर व कर्मचारी यांचे पथक बंगल्याजवळ सुसज्ज ठेवण्यात आले होते आणि यंत्रणेची टेस्ट वारंवार केली गेली. तरी केबलमध्ये काही कारणांमुळे गडबड होऊन अर्धा तास विद्युत पुरवठा ऐनवेळी बंद पडला व पेट्रोमॅक्स व पणत्या/मेणबत्त्या लावून लग्न पार पडले. मुख्यमंत्र्यांनी लग्नाला 'ग्रामीण टच' मिळाला असे म्हणून प्रकरण गांभिर्याने घेतले नाही.

दोन्ही प्रसंगी त्या त्या वेळचे जनरल मॅनेजर मात्र हवालदिल झाले की, आता त्यांना बदलीला सामोरे जावे लागणार नाही ना?

एका भैय्याला बसचे तिकीट न काढल्याबद्दल व दंडाचे पैसे नसल्याबद्दल पकडून पोलीस स्टेशनवर नेले. त्या वेळी डायरीमध्ये नोंद करावयाच्यावेळी त्याने आपले नाव जवाहरलाल मोतीलाल नेहरू असे सांगितले. व त्याचा पुरावा म्हणून ओळखपत्र दाखविले. तो दिल्ली नगरपालिकेत भंगी म्हणून काम करता होता व मुंबई बघायला दिल्लीहून आला होता.

पोलीस ऑफिसर म्हणाले, की स्टेशन डायरीमध्ये जवाहरलाल मोतीलाला नेहरू विनातिकीट प्रवासी गुन्हेगार हे लिहिण्यास बरे वाटत नाही, तेव्हा त्या प्रवाशाकडून अन्य मार्गाने वसुली करून हे प्रकरण मिटवा. शेवटी एका पोलीस शिपायाला त्याच्या नातेवाईकाकडे पाठवून पैसे वसूल करण्यात आले व प्रकरण मिटले. पोलीस रेकॉर्डवर काही आले नाही. अंतुले मात्र मुख्यमंत्री असताना वेश पालटून प्रमोद नवलकरांबरोबर बसमधून तिकीट काढून प्रवास करत. धन्यवाद!

**ग. भा. मराठे (माजी सचिव,बेस्ट)**
**रोहिणी मराठे (माजी शिक्षिका)**
सी-४/२, कॅशुरिना सोसायटी,
बसडेपोजवळ, घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०० ०७५
फोन : ०२२-२५१६३९०७
मोबाईल : ९८६९८७५२२५

*With Best Compliment from:*

M *Matrix Infosystems*

**We create technology solutions**

*We provide following sevices:*
*ERP solutions*
*Payment gateway services and*
*Web Consultancy services like website development.hosting etc.*

**Contact us:-** *H.No-743,Sharada Nagar, Bicholim Goa,Pin-403504*
*Ph- M-9665018418; Email-: anand.marathe@gmail.com*
*Proprietor:- Anand Marathe*

***Note:- Special discount of 5% on all services to members of Marathe pratishthan or Hitaguj subscribers.***

## सहवेदना

ठाणे येथील श्रीमती मंदाकिनी जगन्नाथ मराठे (पृ.३९६) (८०) यांचे १२ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी वृद्धापकालीन आजाराने निधन झाले. त्या मुंबई महापालिकेच्या शिक्षणखात्यातून सेवानिवृत्त झाल्या होत्या. त्यांचे मागे दोन मुलगे, एक मुलगी, सुना, जामात, नातवंडे असा परिवार आहे. 'किरात'कार श्रीधर मराठे यांच्या त्या काकू होत.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. मंदाकिनी मराठे यांना विनम्र श्रद्धांजली

## मानसन्मान

माझा नातू चि. हर्षद प्रसाद आठवले हा ५०,००० मुलांतून ४८वा आला. सी.ए. परीक्षेपर्यंत त्यांनी मेरिटलिस्ट सोडावी नाही. त्याला पाठवलेले हे सन्मान पत्र

*मातेच्या वात्सल्याचा सन्मान*
*पित्याच्या कर्तव्याचा सन्मान*
*गुरुजनांच्या मार्गदर्शनाचा सन्मान*
*उरी जपलेल्या स्वप्नांचा सन्मान*
*अनंत ध्येयासक्तीचा सन्मान*
*प्रयत्नांच्या पराकाष्ठेचा सन्मान*
*ध्येयपूर्तीच्या मार्गावर भेटलेल्या*
*आदर्शांचा सन्मान*
*मित्रांच्या सदिच्छांचा सन्मान*
*जागवलेल्या रात्रींचा सन्मान*
*आशेच्या किरणांचा सन्मान*
*क्षणिक निराशेचाही सन्मान*
*मार्गात भेटलेल्या सत्प्रवृत्तींचा सन्मान*
*त्यांनी दिलेल्या धीराचा सन्मान*
*उंचावलेल्या आत्मविश्वासाचा सन्मान*
*परिपूर्णतेच्या अट्टाहासाचा सन्मान*
*ज्येष्ठांच्या आशीर्वादाचा सन्मान*
*अनुभवांच्या बोलांचा सन्मान*
*ज्यांच्या बळावर मार्गक्रमणा केली*
*त्या संस्कारांचाही सन्मान*
*हर्षद आगे बढो*
*हम तुम्हारे साथ है।*

**- सौ. मेधा श्रीहरी गोडबोले**
(माझी भाचेसून)

**श्रीमती वत्सला स. मराठे**
(पृ. ४२७), C/o स. गो. मराठे, बी/५/
२७, बेस्ट राजहंस, घाटकोपर (पू.) ४००००५

## हितगुज राखीव फंडनिधी

काशिनाथ विष्णू केळकर (सौ लीला दत्तात्रय मराठे यांचे यजमान), देवगड, श्री. श्री. के. मराठे, ठाणे, श्री. शुभातीश सतीश मराठे, पुणे, सौ. वर्षा नंदलाल गोडबोले, पुणे, सौ. शीतल चिन्मय फाळके, पुणे (पृ.१२९), नलिनी दसनूरकर, पुणे, राजापूरच्या नगराध्यक्षा सौ. अपूर्वा मराठे या देणगीदारांचे मराठे प्रतिष्ठानद्वारा आभार

## बुद्धीबळपटू सोहन फडके (मराठे माहेरवाशीणीचा मुलगा) याच अल्पपरिचय

आईचे नाव : निलिमा राजाराम मराठे (घराणे क्र. ५)  सासरचे नाव : सौ. निलिमा फडके.

| | | |
|---|---|---|
| Name | : | Sohan R. Phadke |
| Sport | : | Chess |
| Birth Date | : | 24th May 1985 |
| Acadamic Qualification | : | Post Graduate in Commerce (M.com)<br>Currently doing Diploma im Import-Export |
| Chess Achevements | : | International fide ches rated player recognized by world chess federation named as (FIDE) |
| State Level | : | Champion in U-17 at 2001<br>Champion in U-19 at 2003<br>2nd Runner up in U-19 at 2005 |
| Inter Collegiate | : | Champion in Inter Collegiate at 2005<br>Champion in Inter Zonal at 2005 |
| Rating Chess | : | Champion in Pune Open Rating known as Ashok Khare TMT.<br>Champion in yr 2006 and 2007<br>Champion in Maharashtra State Open Rating Chess TMT. in 2008 |
| National | : | Secured 9th sp-- in yr 2000 U-15<br>Participation in all National events from yr 2002 to 2008 and have secured prizes in nearly all events |
| International Open | : | Participation in yr 2006 and 2007 Commonwealth Chess Championship<br>Participation in Dubai Open 2008 with a decent performane 89. |

* Current Chess International Rating 2284
* Current Ranking : In top 100 of Indian Rating list.

मराठे प्रतिष्ठानद्वारा सोहनचे हार्दिक अभिनंदन.

## वाचकांचा पत्रव्यवहार

'हितगुज'चा सप्टेंबर २०१० चा अंक खूपच वाचनीय आहे. याबद्दल संपादिका म्हणून मी आपले अभिनंदन करतो. हितगुजा येत्या दीपावलीसाठी हार्दिक शुभेच्छा! श्री. अ. दा. मराठे यांनी लिहिलेला 'जपान आमचा व्याही' हा लेख खूपच आवडला. जपानविषयी इंग्रजी तसेच मराठी भाषांतील बरेच लेख व पुस्तके वाचली आहेत, पण अगदी साध्या व घरगुती भाषेत अ. दां.नी हा लेख लिहिला आहे. तो कितीतरी माहिती नव्याने देऊन जातो. विशेषत: त्यात जावई सासऱ्याचे आडनाव लावून त्याचा वंश पुढे चालू ठेवतो ही माहिती अतिशय हृद्य आहे. आपल्याकडेही याचा विचार व्हायला हवा असे प्रकर्षाने वाटते. मद्यपान व धूम्रपान यामुळे तिथल्या लोकंचे दात स्वच्छ नसतात हे शोचनीय आहे. सततच्या होणाऱ्या भूकंपाची काळजी घ्यायची त्यांची पद्धत आपणही विचार करण्यासारखी आहे.

श्री. मोहन सदाशिव मराठे यांचा 'पाईप गॅसची सुरस कथा' हा लेख नोंद घेण्यासारखा आहे. आपल्या समाजात साध्या साध्या गोष्टीसाठी संघर्ष करावा लागतो ही परिस्थिती पुढे कधी सुधारेल का?

प्रतिष्ठान वृत्त वाचले. भूतपूर्व संपादक लक्ष्मणरावांची संपादकीय आवश्यक नाही ही भूमिका मला स्वत:ला मान्य नाही. संपादकाचा वाचकांशी परस्पर संवाद साधण्याचा तोच एक मार्ग आहे आणि माझ्यामते तो आवश्यक आहे. वास्तू प्रकल्प पूर्ण व्हावा यासाठी सर्वांचाच सहभाग आवश्यक आहे, पण गुणवत्ता पारितोषिके न देण्यामागचे कारण मला सबळ आणि पुरेसे वाटत नाही. ज्या देणगीदारांनी काही विशिष्ट कारणासाठी निधी दिला असेल त्यांच्या पूर्वसंमतीनेच पारितोषिके देणे थांबवावे हे आवश्यक आणि उचित ठरेल.

- **श्रीराम व्यंकटेश मराठे,** (पृ.४३), २/६ चंद्रलोक नगरी, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, ४११ ०३८

# वामन शंकर मराठे ज्वेलर्स यांच्या पेढीचे हैद्राबाद (आंध्र) मध्ये पदार्पण दसऱ्याला श्री. अभय मराठे (पृ.२७७) यांनी केले सीमोल्लंघन

तीन वर्षांपूर्वी म्हणजे २००८ साली हैद्राबाद येथील महाराष्ट्र मंडळामध्ये गणपती उत्सवामध्ये श्री. अभय मराठे यांनी प्रथमच सोने व हिऱ्यांचे दागिने यांचे प्रदर्शन भरविले होते.

महाराष्ट्रातून हैद्राबाद म्हणजेच आंध्रप्रदेशमध्ये अशाप्रकारचे दागिन्यांचे प्रदर्शन भरविणारे श्री. अभय मराठे खरोखरच पहिलेच होते. अर्थातच काही प्रमाणात विक्री झाली. अनेक लोकांनी चौकशी केली व भरपूर लोकांचे नाव व पत्ते त्यांनी मिळविले. ते स्वतः दर महिन्याला हैद्राबाद येथे जाऊ लागले व जाण्यापूर्वी शक्य तितक्या लोकांना फोनवरून, ईमेलद्वारे भेटू लागले. त्याच माध्यमातून सोने व हिऱ्यांच्या दागिन्यांच्या ऑर्डरी मिळत गेल्या. त्यामुळे त्यांचा उत्साह द्विगुणीत होत गेला. पुढील गणपती उत्सवापर्यंत म्हणजे एकावर्षामध्ये; त्यांच्या १५ ट्रीप हैद्राबाद येथे झाल्या.

## परिश्रमांना यश

अर्थातच २००९साली त्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळाला. चौकशी वाढत गेली, लोकांनी तयार दागिने खरेदी केले आणि आणखीन नवीन गिऱ्हाईके मिळत गेली.

आणि २०१०च्या विजयादशमीच्या मुहूर्तावर काचीगुडा येथे एक ऑफिस त्यांनी घेतले. काचीगुडा विभाग म्हणजे जिथे महाराष्ट्रीयन लोकं जास्त प्रमाणात राहतात तिथेच ऑफिस थाटले. त्याचप्रमाणे त्यांना सहकार्य करणाऱ्या माणसांची जवळच राहण्याची व्यवस्था त्यांनी केली. तसेच, फोन आणि कॉम्प्युटरचीसुद्धा नेटसह सुविधा उपलब्ध करून घेतली.

त्यांच्या ठाणे येथील दुकानातील २-३जण तिथे जातात. वीस दिवसांनी त्यांच्या माणसांची पुढील बॅच आधीच्या लोकांना बदली करायला जाते. अशाप्रकारे सर्वजण गिऱ्हाईकांसाठी ताजेतवाने राहू शकतात.

## श्री. अभय मराठे यांचे धाडस

दोन वर्षे श्री. अभय मराठे स्वतः गिऱ्हाईकांना त्यांच्या घरी जाऊन सांगितलेल्या वेळी वस्तू नेऊन देत असत त्यामुळे आपोआपच लोकांच्या विश्वासाचा फायदा त्यांना त्यांच्या नवीन ऑफिससाठी भरपूर झाला.

देवाच्या कृपेमुळे व अर्थात लोकांच्या सहयोगामुळे श्री. अभय मराठे महाराष्ट्राच्या बाहेर अशा प्रकारचे धाडस करू शकले.

हैद्राबाद येथे सोने, चांदी व हिऱ्यांचे पहिले प्रदर्शन भरविणारे, या सोनेरी, रुपेरी, रत्नजडीत व्यवसायाची मुहूर्तमेढरोवणारे पहिले मराठी व्यावसायिक श्री. अभय मराठे हे आहेत

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. अभय मराठे यांचे हार्दिक अभिनंदन! आणि हैद्राबाद येथील नव्या व्यवसायात अशीच भरभराट होवो ही सदिच्छा!

**: हैद्राबाद येथील पत्ता :**

**३-३-८१ काचीगुडा, जुन्या प्रभात सिनेमाच्यामागे, हैद्राबाद - २७, फोन : ९८२१८७५७३१**

# प्रत्येकाचं स्वप्न, प्रत्येकाचं घर



घरातल्या प्रत्येकाच्या स्वप्नांचा आम्ही विचार करतो.
म्हणूनच आम्ही प्रत्येक गृहरचनेत मोकळेपणा, उत्कृष्ट जीवनशैली आणि आधुनिक सुखसुविधांचा
समावेश करतो. हे घर तुम्हांला सहजतेने घेता यावं यासाठी वाजवी दरही देतो.
हेच तर आहे निर्माण. तुमच्या स्वप्नांचे आणि सुंदर गृहरचनांचे !

विश्वसनीय परंपरा आणि पारदर्शक व्यवहार

**निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज्**
बिल्डर अँड डेव्हलपर्स

## आमचे आधुनिक जीवनशैलीचे प्रकल्प

मुंबईतील प्रकल्प स्थाने : महालक्ष्मी | जोगेश्वरी | मालाड (आझाद) | कांदिवली (पूर्व) आणि (पश्चिम) | गोवंडी | जोगेश्वरी

मुंबई बाहेरील प्रकल्प स्थाने : नेरळ | गोरेगाव आणि माणगाव | गणपतीपुळे

Project marketed by DREAMZ (A NIRMAN Group Enterprise)

हेड ऑफिस : 14, न्यायसागर, चिनॉय कॉलेज जवळ, जुना नागरदास रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400069
फोन : 91 9987686847 / 48 / 49 | SMS <DREAMZ> 567678


**BOOK POST**

**If undelivered, please return to**

**संपादिका : ‘हितगुज’**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१

**मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, ह्या शुभेच्छा!**


त्रैमासिक ‘हितगुज’ हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल : (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in ⦿ वेबसाईट : www.marathepratishthan.org